RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्षे - २ रे ❑ अंक -२०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.६ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हिंमत असेल तर २८८ उमेदवार उभे कर आणि तू माझ्यासमोर लढ; छगन भुजबळांचं खुलं चॅलेंज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६नाशिक**

रोज रोज भूमिका बदलू नका, २८८ उमेदवार उमेदवार तुम्ही उभे करणार आहात असं बोलताय, तुमच्यात हिंमत असेल २८८ उमेदवार उभे करा हे आमचं आव्हान आहे. प्रत्येक वेळी बदलायचं कारण काय, आज उपोषणाला बसतात आणि दुसऱ्या दिवशी उठतात अशा शब्दात मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, आता जरांगे मुस्लिमांनीही आरक्षण द्या बोलतायेत परंतु मुस्लीम समाजाला महाराष्ट्रात २५ वर्षापूर्वी आरक्षण दिलं. इकडे माळी समाज, तिकडे बागवान, इकडे खाटीक तिकडे कुरेशी, इकडे कासार तिकडे मण्यार असं मुस्लीम समाजाला आरक्षण दिलंय. पण माहिती नसलेल्या गोष्टी अर्धवट माहिती असणारे लोक बोलतात. मध्येच बोलतात मी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणार, मी हे करणार वैगेरे...तू एकच काम कर २८८ जागा लढव असं त्यांनी म्हटलं. टीव्ही ९ च्या कार्यक्रमात भुजबळांनी हे विधान केले आहे.



तसेच मनोज जरांगेंनी स्वत: माझ्यासमोर निवडणुकीत उभं राहावे. माझ्यासमोर उभं राहावे ही माझी इच्छा आहे. मला पाडले तरी माझा आवाज बंद होणार नाही. ओबीसींचे आरक्षण आणि त्यांचे संरक्षण करणे हे माझे काम आहे. मग ते सरकारमध्ये काय किंवा रस्त्यावर काय, भुजबळाला या ५७-५८ वर्षात सवयच आहे. रस्त्यावरही लढायची आणि सरकारमध्येही काम करायची त्यामुळे मला चिंता नाही. येवला मतदारसंघात कुणीही लढावं मी त्याच्याविरोधात १ लाख मतांनी निवडून येईल असा विश्वास छगन भुजबळांनी व्यक्त केला. दरम्यान, यावर त्यांची प्रतिक्रिया विचारली तर आम्हाला राजकारण नको, राजकारणात जायचं नाही असं बोलणार त्यानंतर पुन्हा पाडायच्या भाषा वापरणार, २८८ उमेदवार उभे करण्याची भाषा करणार. पुन्हा एकेकाला बोलावून माहिती घेणार, काहीतरी सर्व्हेक्षण करणार त्यामुळे मनोज जरांगेंना फारसं गांभीर्याने मी घेत नाही असा टोलाही छगन भुजबळांनी लगावला आहे.

## इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्याची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पुणे**

सन २०२४-२५ या वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांना सद्य:स्थितीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत. याबाबत विद्यार्थी, पालक, सामाजिक संघटना यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गाप्रमाणेच इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गातील उमेदवारांकरिता ही मुदत देण्यात आली आहे, असंही मंत्री पाटील यांनी सांगितलं.


सदर प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता, प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे. सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार स्वतः जबाबदार राहतील. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

## माझ्याविरुद्ध कितीही चक्रव्यूह रचले तरीही... देवेंद्र फडणवीसांचा विरोधकांना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ मुंबई**

माझ्याविरुद्ध कितीही चक्रव्यूह रचले तरीही मी अभिमन्यू होणार नाही. मी आधुनिक अभिमन्यू चक्रव्यूहातून बाहेर कसं पडायचं हे मला माहिती आहे असं सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. सुप्रिया सुळे यांच्या बातमीवर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी काही माध्यमात बातमी पाहिली, राष्ट्रवादीच्या प्रवक्त्यांच्या बैठकीत सुप्रिया सुळे यांनी फक्त देवेंद्र फडणवीसांना हल्ला करा. ही आनंदाची गोष्ट आहे. यातून तुमचं राजकारणातील स्थान किती बळकट आहे याचा अंदाज येतो. सगळ्यांना मिळून एकाच व्यक्तीवर हल्ला करावा वाटतं, उद्धवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी, काँग्रेस तेच करते. हे माझ्याविरुद्ध चक्रव्यूह तयार करतायेत. तुम्ही चक्रव्यूह तयार करून मला अभिमन्यू करायचा प्रयत्न करत असला तरी मी आधुनिक अभिमन्यू आहे त्यामुळे चक्रव्यूहात शिरायचं कसं आणि त्यातून



बाहेरही यायचं मला माहिती आहे. त्यामुळे काहीही झालं तरी मी अभिमन्य होणार नाही असं त्यांनी सांगितले.

**काँग्रेसनं उद्धव ठाकरेंना जागा दाखवली**

सर्व्हे लीक होत नाहीत, टेबलावर बसून केलेला सर्व्हे तो त्यांनी लीक केला. उद्धव ठाकरे आणि आमचे पटत नसले तरी सांगतो, हा जो काही सर्व्हे तो उद्धव ठाकरेंना त्यांची जागा दाखवण्याकरता तयार केलेला आणि लीक केलेला सर्व्हे आहे. दुसरा या सर्व्हेत काही अर्थ नाही. त्यांना हे दाखवून द्यायचे होते की, कुठे तुम्ही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करण्याचं बोलताय, तुम्ही चौथ्या-पाचव्या नंबरवर चालले आहात. उद्धव ठाकरेंना काँग्रेसनं सर्व्हेतून जागा दाखवली. उद्धव ठाकरे ३ दिवस दिल्लीत जाऊन बसले. त्यांचा चेहरा मुख्यमंत्री म्हणून घोषित व्हावा असा त्यांचा आग्रह होता. आमचा राष्ट्रीय पक्ष आहे त्यामुळे आम्ही दिल्लीला जात असतो, परंतु आमच्या दिल्ली दौऱ्यावर किती टीका, पण हे ३ दिवस दिल्लीत बसले, सोनिया गांधींना भेटले परंतु त्यांनी फोटो काढायला परवानगी दिली नाही. बैठकीचा फोटोही बाहेर आला नाही. एवढे होऊन ते पुन्हा इथं आले, काही घोषित झाले नाही अशी टीका फडणवीसांनी उद्धव ठाकरेंवर केली.

**शरद पवारांच्या डोक्यात ठाकरेंचा चेहरा नाही**

आता तर शरद पवारांनी स्पष्टपणे घोषित केले मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असणार नाही आणि त्यावर नाना पटोलेंनी लगेच री ओढली मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असणार नाही. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या मनात जे आहे ते नाकारलं आहे. शरद पवारांच्या डोक्यात कुणाला मुख्यमंत्री करायचे हे शिजतंय. त्यांच्या डोक्यात जे काही ३-४ चेहरे असतील त्यात उद्धव ठाकरेंचा चेहरा नाही असा दावाही देवेंद्र फडणवीसांनी केला आहे.

## विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर! महाविद्यालयातून द्या, कराटे प्रशिक्षण, विद्यापीठांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पुणे**

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतशिक्षण घेणाऱ्या मुलींना कराटेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे मुली शैक्षणिक अभ्यासासोबतच शारीरिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी स्वसंरक्षणाचे धडे गिरविणार आहेत. उच्च शिक्षण संचालकांनी मुलींसाठी किमान एकदा तीन महिने कालावधीचा कराटे प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवावा, अशी सूचना शिक्षण संस्थांना करावी, असे आदेश राज्यातील विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक आणि अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना दिले आहेत.



राज्याचे महिला धोरण-२०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ नुसार 'सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबवावा' असे नमूद केले आहे. राज्यात विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याने मुलींना शारीरिकदृष्ट्या सक्षम बनविणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी महिला धोरणानुसार महाविद्यालयीन आणि शालेय मुलींसाठी कराटे प्रशिक्षण वर्ग तत्काळ सुरू करावेत, अशी मागणी दीपू फाउंडेशनच्या वतीने उच्च शिक्षण संचालनालयाकडे करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण विभागाचे संचालकांनी गुरुवार दि. ५ रोजी परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये राज्यातील उच्च शिक्षण विभागाच्या सर्व विभागीय सहसंचालक आणि अकृषी, अभिमत, स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठांच्या कुलसचिवांनी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना तीन महिने कराटे प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवावा, अशी तातडीने सूचना द्यावी, असे नमूद केले आहे.

विभागीय सहसंचालक कार्यालय तसेच विद्यापीठांनी सूचना दिल्यानंतर महाविद्यालयांनी केलेल्या कराटे प्रशिक्षण वर्गांचा अहवाल संकलित करून एकत्रित स्वरूपात उच्च शिक्षण संचालनालयास सादर करावा लागणार आहे. ज्या महाविद्यालयांनी निर्देशानुसार कार्यवाही केली नाही, त्यांच्यावर काय कारवाई केली, याचाही अहवालही सादर करावा, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

## रूपाली चाकणकरांचा नावाला सुरेखा ठाकरे यांचाही विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानपरिषदेसाठी तीन नावांची लवकरच शिफारस केली जाणार असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानपरिषदेसाठी रूपाली चाकणकर सिद्धार्थ कांबळे

आणि आनंद परांजपे यांची नावे दिली जाण्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि राष्ट्रवादीच्या (अजित पवार गट) महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्याबद्दल आता पक्षातील रोष आणि असंतोष वाढताना दिसतोय.

पक्षाच्या जेष्ठ नेत्या सुरेखा ठाकरे यांचाही चाकणकर यांच्या नावाला विरोध आहे. इतर कोणत्याही महिला पदाधिकारीला संधी द्यावी, असं ठाकरे यांचं मत आहे. रूपाली ठोंबरे यांची मत व्यक्त करण्याची पद्धत चुकीची असली तरी त्यांच्या भावना खऱ्या आहेत. सुरेखा ठाकरे या महिला आघाडीच्या माजी प्रदेशाध्यक्षा आणि अमरावती जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा म्हणून त्यांनी काम पहिले आहे. दरम्यान त्यांनी देखील या निर्णयाला आपला विरोध दर्शवला आहे. चाकणकरांच्या नावाला पक्षाच्या चित्रपट आणि सांस्कृतिक आघाडीचाही विरोध होत आहे. पक्षाच्या चित्रपट आघाडीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांची पक्षानं एक व्यक्ती, एक पद' तत्वाचा अंगीकार करावा, अशी मागणीही केली आहे. पक्षाकडे पाटील यांना विधानपरिषदेवर घेण्याची चित्रपट आणि कला क्षेत्रातील अनेकांनी मागणी केली होती.

## विदर्भातील वाघांनी मार्ग शोधला; 'बफर झोन' बाहेर जंगलात वास्तव्य

### वाघांचा विदर्भ, मराठवाडा, मध्य प्रदेशपर्यंत प्रवास; अमरावतीच्या पोहरा-चिरोडी जंगलातही वाघ रमला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अमरावती**

राज्यात पूर्वेकडे असलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघांनी नवा मार्ग शोधल्यामुळे विदर्भातील सर्व जिल्हे वाघांच्या अधिवासाचे प्रमुख केंद्र ठरू लागले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील वाघ हे अलीकडे विदर्भ, मराठवाडा, मध्य प्रदेशपर्यंत प्रवास करत आहेत. हे वाघ काही दिवस भ्रमंती करत असून, कालांतराने मूळ अधिवासात परततात, हे विशेष.

महाराष्ट्रात एकूण सहा व्याघ्र प्रकल्प अस्तित्वात असून, विदर्भात ताडोबा-अंधारी, पेंच, बोर, मेळघाट आणि नवेगाव-नागझिरा हे पाच व्याघ्र प्रकल्प आहेत. राज्यात वाघांची संख्या ३७०च्या वर असल्याची नोंद आहे. यात एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक २५० वाघ आहेत, तर मेळघाटात वाघांची आकडेवारी ७० ते ७५ आहे. मात्र, व्याघ्र प्रकल्पाबाहेर वाघांचा संचार हा चिंतनीय ठरू लागला आहे. चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांतून अनेक वाघ हे बाहेर पडत असल्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढलेला आहे. मध्यंतरी चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधींनी ताडोबातील वाघ सह्याद्रीत हलविण्याच्या



सूचना केल्या होत्या. तरीही मानव-वन्यजीव संघर्ष कायम आहे.

**'कॉरिडॉर'ने व्यापला विदर्भ**

विदर्भातील जंगलाचे प्रमाण लक्षात घेता पाच व्याघ्र प्रकल्प आणि २०च्यावर अभयारण्य आहेत. असे असले तरी ताडोबातून बाहेर पडणारे वाघ वणी मार्गे पांढरकवडा, यवतमाळ पुढे किनवट, माहूर होत वाशिम जिल्ह्यापर्यंत मजल गाठतात. वाघांचा वाशिम हा नवीन कॉरिडॉर वन विभागाने रेकॉर्डवर घेतला आहे. नवेगाव-नागझिरातून बाहेर पडणारे वाघ हे गडचिरोली, मध्य प्रदेशातील शिवणी, बालाघाट पुढे छत्तीसगडपर्यंत भ्रमंती करतात. याशिवाय बोर व्याघ्र प्रकल्पातून बाहेर पडणारे वाघ हे काटोल, कोंडाळी या मार्गाने अमरावती जिल्ह्यातील चिरोडी, पोहरा या वनक्षेत्रापर्यंत भ्रमंती करत आहेत.

**सह्याद्रीत वाघ सोडण्याचा प्रस्ताव फाइल बंद**

चंद्रपूर जिल्ह्यात वाघांची वाढलेली संख्या आणि अपुरे अधिवास बघता राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ताडोबातून काही वाघ सह्याद्रीत सोडण्याचा निर्णय घेतला होता. पुढे राज्य सरकारने हा प्रस्ताव मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठवला. मात्र, हा प्रस्ताव फाइल बंद झाला आहे. सह्याद्रीत रत्नागिरी, सातारा, रायगड, कोल्हापूर हा भाग येत असून, वाघांसाठी पोषक आहे. मात्र, गत पाच वर्षांत 'डबल डिजिट' आकडा गाठू शकले नाही.

## संपादकीय ......

# इस्त्रायलमधील जनआक्रोश

रशिया-युक्रेन युद्ध समाप्त होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नसतानाच, इस्त्रायल आणि हमासमधील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. हमासच्या ताब्यात असलेल्या सहा ओलिसांचे मृतदेह इस्त्रायलने ताब्यात घेतल्यानंतर, ओलिस तरुणांच्या कुटुंबीयांसह हजारो नागरिकांनी संताप व्यक्त केला. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंविरोधात देशभर निदर्शने सुरू झाली असून, या हत्याकांडाला नेतान्याहू हेच जबाबदार असल्याचा आरोप होत आहे. युद्धविराम करार झाला असता, तर ओलिसांची सुटका झाली असती, अशी जनभावना आहे. दक्षिण गाझामधील राफा शहरातील एका बोगद्यात ओलिसांचे मृतदेह सापडले. याच ठिकाणाहून मागच्या आठवड्यात एका ओलिसाची जिवंत सुटका केली होती; पण री इस्त्रायली सैनिक घटनास्थळी पोहोचण्याआधी हमासच्या दहशतवाद्यांनी या ओलिसांची निर्दयपणे हत्या केली. युद्धविरामाच्या वाटाघाटीचे गुर्हाळ सुरूच आहे; पण प्रत्यक्षात युद्ध काही थांबायला तयार नाही. या ओलिसांपैकी गोल्डबर्ग हा इस्त्रायली-अमेरिकी तरुण असून, त्याच्या पालकांनी जागतिक नेत्यांची भेट घेऊन त्याच्या मुक्ततेसाठी दबावही आणला होता. इस्त्रायलने युद्धविराम प्रस्ताव स्वीकारला असता, तर ओलिस ठेवलेले तरुण आता जिवंत असते, असे हमासने म्हटले आहे.

वास्तविक इस्त्रायलवर गेल्या वर्षी प्रथम हल्ला चढवला, तो हमासने. हमासने इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागली, बाँबहल्ले केले आणि अनेक सामान्य नागरिकांचे अपहरणही केले. त्यानंतर इस्त्रायलने गाझापट्टीत तुफान हल्ले केले. आता ओलिसांच्या हत्येनंतरही इस्त्रायलने गाझात पुन्हा हल्ले करून ३३ पॅलेस्टिनींना ठार मारले आहे. त्यामध्ये पॅलेस्टिनी व हमासच्या दहशतवाद्यांचा समावेश आहे. इस्त्रायलला केली जाणारी शस्त्रनिर्यात स्थगित करण्याचा निर्णय बि-टिश सरकारने घेतला आहे; पण त्यांच्या मदतीशिवायही हमासविरुद्धचे युद्ध जिंकू, अशी गर्जना नेतान्याहू यांनी केली आहे.

युनोशिवाय युरोपीय देश, इजिप्त, कतार ही इस्लामी राष्ट्रे आणि अमेरिका यांचे युद्धसमाप्तीसाठी प्रयत्न जारी आहेत; मात्र अद्याप संघर्ष संपण्याची चिन्हे बिलकुल दिसत नाहीत. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्त्रायलवर जो हल्ला केला होता, त्यात १२०० सामान्य लोकांचा बळी गेला होता. ही घटना घडली, तेव्हा नेतान्याहू यांची देशातील लोकप्रियता घसरणीला लागली होती. न्यायव्यवस्थेवर दडपण आणण्याच्या त्यांच्या धोरणामुळे केवळ विरोधकच नव्हे, तर जनताही नाराजच होती. लोकप्रियतेस लागलेली ओहोटी थांबवण्यासाठी ही संधीच आहे हे जाणून, नेतान्याहू यांनी हमासविरोधात थेट दंड थोपटले. नेतान्याहू यांनी आतापर्यंत हमासच्या अनेक कमांडर्सना ठार मारले आहे. एवढेच नव्हे, तर हमासचा सर्वोच्च नेता इस्माईल हानिया हा तेहरानच्या दौर्यावर असताना, इस्त्रायलने तेथेच त्याची हत्या घडवून आणली. हानिया ज्या सरकारी अतिथिगृहात मुक्कामाला होता, तेथे इस्लामिक रेव्होल्यूशनरी गार्डस्चा कडेकोट पहारा असतानाही, इस्त्रायलने हानियाची बाँबस्फोट करून हत्या घडवून आणली.

# तुमच्या हक्काच्या घराचं स्वप्न पूर्ण होणार, सरकार करतंय इतक्या लाखांची मदत; असा घेता येईल लाभ

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक-** केंद्र सरकारने प्रत्येक नागरिकांचे स्वतः चे हक्काचे घर असावे या उद्देशातून प्रधानमंत्री आवास योजनेची सुरुवात केली आहे. ३ कोटी लोकांना या योजनेतून घर बनवण्यासाठी मदत करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे. मागील दहा वर्षात जवळपास ४.२१ कोटी घरे बनवण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रता आणि अर्जप्रक्रिया काय ते जाणून घेऊया.

**प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रकार-** प्रधानमंत्री आवास योजनेचे दोन प्रकार आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी वेगवेगळी योजना आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आणि प्रधानमंत्री आवास योजना शहरी अशा दोन योजने सुरु करण्यात आल्या आहेत.

**पीएम आवास योजनेचे फायदे**

ज्या नागरिकांकडे स्वतः चे हक्काचे घर नाहीत ते लोक पीएम आवास योजनेचा लाभ घेऊ शकतात.

जर एखाद्या व्यक्तीकडे जमीन आहे परंतु घर बांधण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. अशा लोकांना घर बांधण्यासाठी आर्थिक मदत केली जाते.

या योजनेअंतर्गत होम लोनवर सब्सिडी देण्यात येते. ही सब्सिडी नागरिकांच्या उत्पन्नावर आधारित असते. या योजनेअंतर्गत बँकाना कमी व्याजदरावर लोन देण्यासाठी प्रोत्साहन



दिले जाते.

**पात्रता** --या योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे.

अर्जदार हा भारतीय नागरिक असावा.

प्रधानमंत्री योजनेअंतर्गत १८ लाखांचे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लोकांना मदत केली जाते.

योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडे स्वतः चे पक्के घर नसावे.

परिवारातील कोणताही सदस्य सरकारी नोकरीत नसावा. एथड प्रवर्गातील नागरिकांचे उत्पन्न ३ लाखांपेक्षा कमी असावे.

**अर्ज कसा करावा –** या योजने अंतर्गत तुम्ही ऑनलाइन किंवा ऑफ लाइन पद्धतीने अर्ज करु शकतात. ऑफलाइन पद्धतीने अर्ज करण्यासाठी तुम्हाला जवळच्या कॉमन सर्विस सेंटर (उडउ) येथे जावे लागेल. ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यासाठी हींींि:// ग्रिूस.पळल.ळप या वेबसाइटवरुन अर्ज करावा लागेल.पीएम आवास योजनेअंतर्गत सरकार गरीब नागरिकांना घरे बांधण्यासाठी मदत करते. आतापर्यंत कोट्यवधी लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

# तिवसा न. पं.च्या वतीने बेमुदत कामबंद आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६तिवसा-** राज्यातील सर्व नगर परिषदांमधील -संवर्ग कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी पुकारलेल्या कामबंद आंदोलनात तिवसा नगरपंचायतही सहभागी झाली आहे. जुनी हक्काची पेन्शन व इतर मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे.नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात दिलेल्या आश्वासनाकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे पालिका कर्मचाऱ्यांनी बंद पुकारला असून २००५ नंतर सेवेत कार्यरत झालेल्या नगर परिषद कर्मचाऱ्यांना जुनी



पेन्शन योजना लागू करावी, दहा वर्षे होऊनही कपात केलेली डीसीपीएस-एनपीएसची रक्कम स्वतंत्र खात्यात जमा करावी, सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेत पालिका आस्थापनेवरील पदांचा समावेश करून सेवार्थ नंबर देण्यात यावा व कालबद्ध पद्धतीने रखडलेल्या प्रकरणाचा निपटारा करावा इत्यादी मागण्यासाठी काम बंद आंदोलन पुकारण्याची वेळ नगरपालिका कर्मचाऱ्यांवर आली. या आंदोलनात पालिका संघटनेचे न. पं.चे प्रशासकीय अधिकारी रोहन राठोड, लेखापाल रत्नेश खडसे, अभिजित लोखंडे, दयानंद डेहणकर, सूरज शापमोहन, आकाश सोनेकर, सुधीर विघ्ने, सचिन मकेश्वर, अभिजित गौरखेडे, जुबेर पठाण, श्वेता खुळे, मंगला नवघरे, नांदगावकर आदी सहभागी झाले.

# सोयाबीन पिकाचे शेंगा भरण्याच्या अवस्थेत कसे कराल व्यवस्थापन

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक**

सोयाबीनपीक सद्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहे. त्यातच काही भागामध्ये सतत पाऊस पडत आहे. पिकाच्या या अवस्थेदरम्यान त्यावर वेगवेगळ्या किडी व रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी बांधवांना पुढील प्रमाणे सल्ला देण्यात येत आहे.

जास्त पाऊस पडत असेल व शेतात सोयाबीनपीकामध्ये पाणी साठत असेल तर, उताराच्या दिशेने पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.


रायझोबॅक्टेरिया एरियल ब्लाइट रोगाची लक्षणे दिसू लागल्यावर याच्या नियंत्रणासाठी शिफारस केलेले बुरशीनाशके जसे पायरोक्लोस्ट्रोबिन २०% डब्ल्यूजी (३७५-५०० ग्रॅम/हे) किंवा फ्लुक्सापायरोक्साईड १६७ ग्रॅम/लि + पायरोक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/ली एससी (३०० मिली/हे) किंवा पायरोक्लोस्ट्रोबीन + इपोक्कोसीकोनाजोल ५० ग्रा/ली एसई (७५० मिली/हे) या बुरशीनाशकांची फवारणी करावी.

सतत पाऊस पडणाऱ्या भागात ॲन्थ्राक्नोज रोगाची शक्यता जास्त असते. त्यामुळे त्याची सुरुवातीची लक्षणे दिसल्यानंतर शेतकऱ्यांनी त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लवकरात लवकर टेब्युकोनाझोल २५.९ ईसी (६२५ मिली /हे) किंवा टेब्युकोनाझोल ३८.३९ एस.सी. (६२५ मिली/हे) किंवा टेब्युकोनाझोल १०% + सल्फर ६५%थऋ(१.२५ ज्ञस/हर) किंवा कार्बेनाझम १२% + मँकोझेब ६३% थझ. (१.२५ किलो/हे) पिकावर फवारावे.

पिवळा मोझॅक/सोयाबीन मोझॅक रोगाची लक्षणे दिसताच रोगग्रस्त झाडे शेतातुन उपटून नष्ट करावीत. अशी उपटलेली झाडे

**कृषी विशेष**

शेतात इतरत्र हातात घेऊन फिरू नये. हाँ रोग पसरवणाऱ्या पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एसिटामिप्रीड २५% + बायफेन्थ्रिन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हे) ची फवारणी करावी. किंवा त्याऐवजी पूर्व-मिश्रित कीटकनाशक थायोमेथोक्झाम + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली/हे) किंवा बीटासिफ्लुथ्रिन +इमिडाक लोप्रिड (३५० मिली/हे) देखील फवारता येऊ शकते. पांढर्या माशीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात ठिकठिकाणी पिवळ्या रंगाचे चिकट सापळे लावावेत. ऊंट आळीच्या नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्याही एका रसायनाची फवारणी करावी. क्लोरएंट्रानिलिप्रोल १८.५ एससी, (१५० मिली/




हे) किंवा ईमॅमेक्टिन बेंझोएट ०१.९० ईसी (४२५ मिली/हे), किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० स/श्र एससी (४२-६२ ग्रॅम/हे), किंवा फ्लुबेन्डियामाइड २० डब्लूजी (२५०-३०० ग्रॅम/हे) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ एससी (१५० मिली) किंवा एसिटामिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हे) किंवा इंडोक्साकार्ब १५.८० ईसी (३३३ मिली/हे), किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन ०४.९० % सीएस (३०० मिली/हे) किंवा प्रोफेनोफोस ५०% ईसी (१ ली/हे) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी (२५०-३०० मिली/हे) किंवा पूर्व-मिश्रित बीटा-सायफ्लुथ्रीन ०८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१% डब्लू/डब्लू ओडी (३५० मिली/हे) किंवा नोव्हॅलुरॉन+ इंडोक्साकार्ब ०४.५०% एससी (८२५-८७५ मिली/हे) किंवा पूर्व मिश्रित थायामेथोक्सम + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन (१२५ मिली/हे) किंवा क्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % जेडसी (२०० मिली/हे) ची फवारणी करावी.

तंबाखूवरील पाने खाणार्या आळीच्या (स्पोडोप्टेरा लिटुरा) नियंत्रणासाठी, शेतकऱ्यांना पुढील प्रमाणे कोणतेही एक कीटक नाशक फवारणी करण्याचा सल्ला दिला जातो.इमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% ईसी (४२५ मिली/हे) किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/लिटर एससी (४२-६२ ग्रॅम/हे) किंवा सिटामिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हे) किंवा इंडोक्साकार्ब १५.८०% ईसी (३३३ मिली/हे), किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी (२५०-३०० मिली/हे) किंवा स्पिनोटेरम ११.७ एससी (४५० मिली/हे) किंवा नोव्हॅल्युरॉन+इंडोक्साकार्ब ०४.५० % एससी (८२५ - ८७५ मिली/हे).

आपल्या शेतात जर ऊंट आळी + शेंगा खणारी आळी + तंबाखूचे पाने खणारी आळी (स्पोडोप्टेरा लिटुरा) यांचा एकाच वेळी प्रादुर्भाव आढळून आला तर त्यांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना खालीलपैकी कोणत्याही कीटकनाशकाची फवारणी करण्याचा सल्ला दिला जातो: ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/लिटर एससी (४२-६२ ग्रॅम/हे किंवा फ्लुबेंडियामाइड ३९.३५ %/ डउ (१५० मिली/हे) किंवा इंडोक्साकार्ब १५.८०% ईसी (३३३ मिली/हे), किंवा नोव्हॅल्युरॉन+इंडोक्साकार्ब ०४.५०% एससी (८२५-८७५ मिली/हे). जर पाने खाणार्या अळ्यांचा (हिरवा सेमिल्युअर, हेलिओथिस आणि तंबाखू सुरवंट) प्रादुर्भाव + शोषक कीटक (पांढरी माशी/ॲफिड/जॅसिड्स) + शेंगा पोखरणार्या किडी (चक्री भुंगा/खोड माशी) यांच्या एकत्रीत नियंत्रणासाठी पुढीलप्रमाणे पूर्व मिश्रित कीटकनाशक फवारण्याचा सल्ला देण्यात येतो. थायामेथोक्सम १२.६०%+ लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ०९.५०% झेडसी किंवा बीटासिफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड किंवा सिटामिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% डब्ल्यूजी किंवा क्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३०% + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०९.५०% झेडसी. कमी कलावधीत पक्क होणार्या वाणांच्या कोवळ्या शेंगा उंदराने खाल्लयामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी फ्लोकोउमाफेन ०.००५% हेक्टरी १५-२० वड्या उंदरांच्या छिद्रांजवळ ठेवावेत.

आघारकर संशोधन संस्था, पुणे




## नसांमध्ये जमलेलं वाईट कोलेस्ट्रॉल दूर करेल केवळ हा एक ज्यूस,

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल धावपळीच्या जीवनात चुकीच्या आहाराचं सेवन मोठ्या प्रमाणात केलं जातं. या अनहेल्दी लाईफस्टाईलमुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका असतो. शरीरात वाईट आणि चांगलं अशा दोन प्रकारचं कोलेस्ट्रॉल असून वाईट कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढतो.



शरीरात कोलेस्ट्रॉल वाढू नये यासाठी चांगला आहार घेणं गरजेचं आहे. मात्र तुम्हाला माहितीये का, असा एक ज्यूस आहे तो तुमच्या नसांमध्ये जमलेलं वाईट कोलेस्ट्रॉल साफ करण्यात मगत करतं. शिवाय या ज्यूसच्या सेवनाने हृदयविकाराचा झटका येण्याचं प्रमाण देखील कमी होतं.

कोणता आहे हा ज्यूस?

हा ज्यूस आवळा आणि गाजरचा आहे. मुळात आवळा आणि गाजर या दोन्ही गोष्टी आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. आवळ्यामध्ये व्हिटॅमीन सीचं प्रमाण भरपूर असतं. जे कोलेस्ट्रॉलला कंट्रोल करण्यासाठी देखील फायदेशीर असतं. दुसरीकडे गाजरामध्ये बीटा कॅरोटीन असतं जे तुमच्या हृदयापर्यंत पोहोचणाऱ्या नसांना साफ ठेवतं.

कसा बनवायचा हा ज्यूस?

हा ज्यूस तयार करण्यासाठी २ आवळे, २ गाजर, थोडसं पाणी आणि स्वादासाठी एक चमचा मध या साहित्याची गरज भासणार आहे.

कृती- पहिल्यांदा आवळा आणि गाजर स्वच्छ धुवून घ्या. यानंतर आवळ्याचं ही काढून त्याचे छोट छोटे तुकडे करा. यासोबत गाजराचेही बारीक तुकडे करून घ्या.

आता या दोन्ही गोष्टी मिक्सरमध्ये टाकून त्यात थोडं पाणी घाला. यानंतर ते चांगल्या पद्धतीने ब्लेंड करून त्याच मध टाका.

कधी प्यावा हा ज्यूस?

रोज सकाळी रिकाम्या पोटी हा ज्यूस प्यायल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत मिळू शकते. त्याचप्रमाणे हृदयाच्या आजारांचा धोकाही कमी होतो. आवळा आणि गाजराचा ज्यूस नैसर्गिकरित्या कोलेस्ट्रॉल कमी करतं. त्याचप्रमाणे हा ज्यूस शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतो. हृदयाच्या आरोग्यासोबत तुमची रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होण्यास मदत होते.

# नवीन विहिरीसाठी व जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी मिळतंय अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती –** नागरिकांचा जीवनस्तर उंचावण्याबरोबरच राज्याचा आर्थिक कणा असलेला बळीराजा अधिक सक्षम होण्यासाठी राज्यशासन विविध योजना राबवत असते.

राज्य शासनाच्या अशा योजनांपैकीच शेतकऱ्यांना स्वावलंबी घडविण्यासाठी अस्तित्वात आलेली एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेकडे पाहिले जात आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी कमी करण्यासाठी आर्थिक मदत स्वरूपात शेतात विहीर बांधण्यासाठी सुमारे अडीच लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

त्यांना त्यांच्या शेतात जास्तीत जास्त उत्पन्न घेता यावे. तसेच या प्रवर्गातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने डॉ. आंबेडकर कृषी स्वावलंबन ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ही योजना सुरू केली आहे.

**कृषी स्वावलंबन योजना?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना महाराष्ट्र



राज्य सरकारने २०२४ मध्ये सुरू केली आहे. या योजनेची अधिकृत सुरुवात जानेवारी २०२४ मध्ये करण्यात आली होती. योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य, तांत्रिक प्रशिक्षण आणि जल व्यवस्थापनाच्या साधनांची उपलब्धता करून देणे आहे. हे महाराष्ट्र राज्य सरकारचे एक महत्त्वपूर्ण कृषी विकास अभियान आहे. या योजनेचा उद्देश शेती क्षेत्रातील विकास साधणे आहे.

**कशासाठी किती पैसे मिळतात?**

**१) नवीन विहिरीसाठी अडीच लाख**

नवीन विहीर प्रति लाभार्थी देय उच्चतम अनुदान मर्यादा दोन लाख ५० हजार रुपये आहे.

२) विहीर दुरुस्तीसाठी ५० हजार रुपयांचे अनुदान

जुनी विहीर दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त ५० हजार रुपये शासनाकडून अनुदान मिळत आहे.

**कोणाला घेता येतो लाभ?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकरी घेऊ शकतात.

अर्ज कसा कराल?

या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलचे https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेतस्थळावर शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीचे कृषी विभागाशी संपर्क साधावा.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ६ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण

## संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव विकास आराखडा

# प्रलंबित विकासकामे गतीने पूर्ण करा- डॉ. निधी पाण्डेय

### विविध विकासकामांची विभागीय आयुक्तांकडून पाहणी





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती,** संत गाडगेबाबा निर्वाणभूमी वलगाव विकास आराखड्यांतर्गत असलेल्या भक्त संकुल, ध्यान केंद्र व स्मशान भूमी आदी विविध विकासकामांची पाहणी विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज केली. यानुषंगाने आराखड्यातील विकासकामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होण्यासह ती गतीने पूर्ण करावीत, असे निर्देशही त्यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना दिले.

या पाहणी दौऱ्यात जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सोनवाल, विशेष कार्य अधिकारी सुशील आग्रेकर, तहसीलदार विजय लोखंडे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

संत गाडगेबाबा यांनी संपूर्ण महाराष्ट्रात किर्तन, भजनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या दृष्टीने त्यांनी जनजागृती करुन स्वच्छतेचा संदेश सर्वदूर जनमाणसांत पोहाचविला. अशा या कर्मयोगी संताचे विचार व स्मृती लोकांना प्रेरणादायी ठरावे, यासाठी वलगाव या संत गाडगेबाबांच्या निर्वाणभूमी लगतच्या १० एकर जमीनीवर स्मृती केंद्र उभारण्यासाठी शासनाने ३७ कोटी रुपयाचा विकास आराखडा मंजूर केला आहे. यातून स्मृती केंद्राच्या ठिकाणी संत गाडगेबाबांचा कांस्य पुतळा बसविणे, प्रतिक्षालय इमारत, भक्त संकुल, ध्यान केंद्र, उद्यान, सभामंडप, समाधीस्थळाचे सौंदर्यीकरण व परिसराचा विकास, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, बसस्थानकाचे बांधकाम आणि सौंदर्यीकरण, पेढी नदीवरील घाटाचे बांधकाम व दुरुस्ती आदी विकासकामांचा समावेश आहे.

आराखड्यातील प्रलंबित विकासकामे गतीने पूर्ण करण्यात यावीत. तसेच निर्माण झालेल्या इमारत, उद्यान, संकुल व ध्यानकेंद्र आदींच्या रखरखाव व स्वच्छतेच्या दृष्टीने ती हस्तांतरीत करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. याठिकाणी नियमितपणे काळजीवाहक उपस्थित राहणार यादृष्टीने संबंधित विभागाने दक्षता घ्यावी. प्रलंबित बांधकामे व सौंदर्यीकरणाची कामे गतीने पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी संबंधित विभागांना दिल्या.

# शहरात ३०४ तर ग्रामीणमध्ये १३०९ मंडळांना परवानगी


## पोलिसांचा राहणार तगडा बंदोबस्त





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती-** अमरावती शहरात बाप्पांचे आगमन अवघ्या काही तासावर आले आहे. अशातच आतापर्यंत शहरातील १० पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३०४ गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्यात आली आहे, तर ग्रामीणच्या ३१ पोलिस ठाण्याच्या हद्दीत तब्बल १३०९ गणोशोत्सव मंडळांना परवानगी देण्यात आली. सीपी व एसपी कार्यालयात एक खिडकी योजनाव ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया प्रभावी ठरल्याने अतिशय कमी वेळात ही नोंदणी करण्यात आली. शहरात ५०० पेक्षा जास्त सार्वजनीक ठिकाणी बाप्पा विराजमान होणार असल्याने पोलिस यंत्रणा दिवसोंदिवस अर्लट होत आहे.गेल्या वर्षी अमरावती शहरात पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत ४९९ गणोशोत्सव मंडळाने बाप्पांची स्थापना केली होती. यामध्ये राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत ५९, कोतवाली २८, खोलापुरीगेट ३२, भातकुली १९, बडनेरा ७०, गाडगेनगर ८०, नागपुरीगेट १७, वलगाव ४३, फ्रेजरपुरा ४६, नांदगावपेठ ४७ एवढया गणोशोत्सव मंडळाने स्थापना केली होती. शहरात ५ सप्टेंबर रोजी ३०४ मंडळांची नोदणीपूर्ण झाली असल्याने ६ सप्टेंबर रोजीहा आकडा ५०० पेक्षा जास्त जाण्याची शक्यता आहे. ग्रामीणमधील ३१ पोलिस ठाण्याच्या हद्दीतगतवर्षी १२८७ मंडळांनी बाप्पांची सार्वजनीक ठिकाणी स्थापना केली होती. यावेळी हा आकडा ५ सप्टेंबर पर्यंत १३०९ झाल्याने ६ सप्टेंबर रोजी आणखी मंडळांची वाढ होण्याची शक्यता आहे.



गणेशोत्सवावर लाखो रुपये खर्च करताना महिला व सार्वजनिक सुरक्षेसाठी प्रत्येक मंडळाने किमान दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.!! शहरातील प्रत्येक मंडळावर पोलिस यंत्रणेचीनजर करडी नजर राहणार आहे. याशिवाय पोलिसांची फिरती गस्त सुध्दा दिवसरात्र सुरू राहणार आहे.

गणोशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी शहर पोलिसांच्यावतीने गणेशोत्सव मंडळांनानियम आखूनदेण्यात आले आहे. गणेश चतुर्थी, उत्सवाचा ६ वा दिवस तसेच ९वा, दहावा व अकरावा दिवस या पाच दिवशी १२ पर्यंत साऊंड सिस्टीमला परवानगी असेल. अन्य दिवशी १० वाजल्यानंतर ध्वनी यंत्रणा बंद करावी लागेल. जी मंडळाने बंदकरणार नाही, त्यांच्यावर गुन्हे दाखल होतील. परवानगी असलेल्या वेळेत साऊंड सिस्टमचा आवाज ७५ डेसिबलपेक्षा जास्त असला तरीही गुन्हे दाखल करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.-



# फॅमिली रेस्टॉरंटआड गैरवर्तन; पुन्हा दोन जोडपी पकडली

### महिला सेलच्या दामिनी पथकाची कारवाई : केबिन संस्कृतीवर टाच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :** तरूण प्रेमीयुगुलांना अश्लील चाळे करण्यासाठी ४०० ते ५०० रुपये घेऊन जागा उपलब्ध करून देणाऱ्या राजापेठ परिसरातील वाआ फॅमिली रेस्टॉरंटवर महिला सेलच्या दामिनी पथकाने ५ सप्टेंबर रोजी दुपारी धाड टाकली. यावेळी तेथे दोन जोडपी अश्लिल चाळे करताना आढळून आली.

राजापेठ परिसरातील वाआ रेस्टॉरंटमध्ये काही तरुण तरुणी अश्लील चाळे करीत असल्याची माहिती महिला सेलच्या पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मणे यांना मिळाली. त्याआधारे पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मणे यांनी पोलीस उपनिरीक्षक सुषमा आठवले व दामिनी पथकासह वाआ रेस्टॉरंटवर धाड टाकली. तेथे चार तरुण व तरुणी अश्लिल चाळे करताना आढळून आलेत. त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस प्रतिबंधक अधिनियमाअन्वये कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त नवीचंद्र रेड्डी व पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ४ सप्टेंबर रोजीदेखील गाडगेनगर भागातील दोन कॅफेतून सहा जोडपी पकडण्यात आली होती.

# जावरे पिता-पुत्रांना लुटणारी ती गँग मध्यप्रदेशातील?

## काही आरोपी ट्रेस, ७ पथके विविध दिशेने रवाना




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती** - दुचाकी व कारमध्ये आलेल्या अज्ञात ८ ते १० लुटारूंनी देशी कट्टयाच्या धाकावर उज्वल कॉलनी भागातील रेखा लेआऊटजवळ जावरे या सोनार पिता-पुत्रांची २५ लाखांची चांदी लुटली होती. या घटनेनंतर सीपी रेड्डींनी ७ पथके तयार करून विविध दिशेने रवाना केली आहे. पोलिसांनी आतापर्यंत विविध भागातील १५० पेक्षा जास्त ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केल्यानंतर जावरे पिता-पुत्रांना लुटणारी गँग मध्यप्रदेशातील असून गुन्ह्यात वापरलेली कार व दुचाकी सुध्दा चोरीची असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविली आहे.



अरविंद उत्तमराव जावरे (४५), उत्तमराव जावरे (८५) दोन्ही रा. जवाहर नगर अशी दोन्हीजखमींची नावे आहे. माहितीनुसार, जावरे पिता-पुत्रांचे उज्वल कॉलनीत जावरे ज्वेलर्स नामक सोन्या-चांदीचे दागिने व भांडे बनविण्याचे दुकान आहे. ४ सप्टेंबर रोजी अरविंद व उत्तमराव जावरे हे नेहमीप्रमाणे सकाळी ११.१५ वाजताच्या सुमारास ॲक्टीव्हा मोपेडने दुकानात जाण्यासाठी निघाले असता उज्वल कॉलनी भागातील रेखा कॉलनीजनीकच्या वसुधंरा लेआऊटमध्ये सितला माता मंदिरासमोर आली असता आधीपासून कार व दुचाकीने दबा धरून असलेल्या अज्ञात लुटारूंनी अचानक कार, दुचाकी अरविंद जावरेंच्या दुचाकीसमोर आणून त्यांना अडविले. त्यानंतर ८ ते १० लुटारूंनी अचानक अरविंद जावरेंवर झडप घातली. लुटारूंपैकी चौघांजवळ देशी कट्टे होते. एका लुटारूने अरविंद यांच्या नाकावर उलटया कट्टयाने वार करून त्यांना गंभीर जखमी करून त्यांच्याजवळील चांदीची पिशवी लुटली आणि कारमध्ये ठेवली. लुटारूंसोबत झटापट सुरू झाल्यानंतर अरविंद यांनी त्यांच्या जवळील सोन्याची पिशवी बाजूला असलेल्या रामेश्वर बाहेकर यांच्या घरात फेकली. काही लुटारूंनी उत्तमराव जावरे यांना लाथ मारून खाली पाडले. अरविंद जावरे यांनी लुटारूंसोबत बरीच झटापट केली. एका घरावर उभी असलेली महिला पोलिसाने आरडओरड करण्याचा प्रयत्न केला असता लुटारूंनी महिलेला कट्टयाचा धाक दाखवून शांत केले.शहरात ही थरारक घटना घडल्यानंतर सीपी रेड्डी यांनी स्थानिक पोलिस, गुन्हेशाखा व सीआययू पथकाची ७ स्वतंत्र पथके तयार करून विविध दिशेने रवाना केली आहे. पोलिसांनी आतापर्यंत विविध भागातील १५० पेक्षा जास्त ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केल्यानंतर जावरे पिता-पुत्रांना लुटणारी गँग मध्यप्रदेशातील असून गुन्ह्यात वापरलेली कार व दुचाकी सुध्दा चोरीची असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला असून लवकरच संपूर्ण गँग पोलिसांच्या रडावर येणार आहे.

# बडनेराच्या रेल्वे पुलावर पडले तडे, नागरिकांमध्ये तीव्र असंतोष



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** अमरावती-बडनेरा रेल्वे पुलावर १. बरेच मोठे तडे पडल्याचे दिसून येत असून, यामुळे येथे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सुरक्षीतता म्हणून येथे वाहतूक पोलिस तैनात करण्यात आला आहे. मात्र पुलाचे कंत्राट घेतलेल्या कंपनीकडून याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. बडनेरा शहराच्या अमरावती रोड स्थित रेल्वे पुलाला लागून नवीन उड्डाणपुलाचे बांधकम महारेल्वेच्या माध्यमातून केले जात आहे. या बांधकामाकरिता खोदकाम केले जात असल्यामुळे अमरावती-बडनेरा रेल्वे पुलावर बरेच मोठे तडे पडल्याचे दिसून येत आहे. यामुळे येथे मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उड्डाणपुलाचे बांधकाम करणारी नागपूर येथील सीएस कंस्ट्रक्शन कंपनीकडून योग्य ती खबरदारीची उपाययोजना केली जात नसल्यामुळे नागरिकांमध्येअसंतोष पसरला आहे. मागील दहा वर्षापासून अमरावती शहरातील पंचवटी चौक ते बडनेरा शहरातील यवतमाळ टी पॉइंट पर्यंत मुख्य मार्गासह शहरातील सर्व मार्गांचे कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु करण्यात आले होते. अमरावती बडनेरा मार्गाचे काम नवाथे चौका पर्यंत पूर्ण झाल्यानंतर नेमाणी गोदाम ते बडनेरा शहराच्या गांधी विद्यालया पर्यंत या फोर लेनचे काम पूर्ण झाले होते. परंतु बडनेरा रेल्वे उड्डाणपुलाचे काम निधी अभावी होऊ शकले नव्हते. परंतु २४ नोव्हेंबर २०२३ ला बडनेरा शहरातील गांधी विद्यालया समोरुन पोलिस स्टेशनसमोरील संतोषी माता मंदिरापर्यंत उड्डाणपुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. सुमारे ६५० मिटर लांब या उड्डाण पुलाच्या बांधकामाचे कंत्राट नागपुरच्या सीएस क न्स्ट्रक्शन कंपनीला मिळाले आहे. याकरिता आरडी आईच्या कॉलेजसमोर मिक्सर प्लांट उभा करण्यात आला आहे. बडनेरा पोलिस स्टेशनसमोर समोर स्थित उड्डाणपुलाला लागून हा दुसरा उड्डाणपुला बांधला जात आहे. याकरिता अमरावती बडनेरा मार्गाच्या रेल्वे पुलाला लागून खोदकामकरुनभिंत उभी केली जात आहे. परंतु काम अत्यंत मंदगतीने सुरु असल्यामुळेमागील दोन महिन्यापासून सतत पावूस सुरु असल्यामुळे उड्डाणपुलाकरिता खोदलेल्या खड्डयांमध्ये पाणी साचले आहे. तसेचनिर्माणाधिन उड्डाणुपलावर भिंत उभी करण्याचे काम सुरु असताना, त्यामध्ये मुरुमाची भरती न केल्यामुळे सध्या वाहतुकीच्या रेल्वे ब्रीजमध्ये तडे पडण्यास सुरुवात झाली आहे. या पुलाला लागून असलेली मातीही हळुहळू घसरत चालली आहे. यामुळे येथे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुलावरील तडे दिवसेंदिवस वाढत चालले असून, यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

# १६ शिक्षक आदर्श पुरस्काराने सन्मानित, सीईओ संजीता महापात्र यांच्या हस्ते वितरण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती-** जिल्हा परिषदेच्यावतीने दरवर्षी ५ सप्टेंबर या शिक्षकदिनी आदर्श शिक्षक पुरस्कार दिलेले जातात. त्यानुसार सन २०२३-२४ चा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा गुरुवारी येथील मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात पार पडला. झेडपीच्या सीईओ संजीता महापात्रा यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमात जिल्ह्यातील १६ शिक्षकांना जिल्हास्तरीय आदर्श पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला अतिरिक्त सीईओ संतोष जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अश्विनी मारणे, डायटचे प्राचार्य मिलिंद कुबडे, डेप्युटी सीईओ डॉ. कैलास घोडके, प्राथमिक शिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख,शिक्षणाधिकारी निखिल मानकर,गजला खान आदींचीउपस्थिती होती.

याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात सीईओ संजीता महापात्रा यांनी आपल्या समोर आयएएस अधिकारी म्हणून उपस्थित आहे, याचे सर्व श्रेय माझ्या शिक्षकांना जाते. माझ्या जडणघडणीत आई वडिलांसह शिक्षकांचा मोठा वाटा आहे. प्रशिक्षण दरम्यान मसुरी येथे ग्लोबल पुरस्कार विजेते शिक्षक रणजितसिंह देसले यांनी तब्बल १८० आयएएस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले ही अभिमानाची बाब आहे.

आज आपल्या सर्व आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना नवनवीन दालने उपलब्ध आहे. आदर्श शिक्षकांना शुभेच्छा देत उद्या कदाचित तुमचे विद्यार्थीसुद्धा आयएएस होतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बुद्धभूषण सोनोने यांनी तर संचालन प्रतिभा काठोळे,शैलेंद्र दहातोंडे,आभार दीपक कोकतारे यांनी मानलेत.

यांचा झाला गौरव.....

जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार अंतर्गत दिव्यांग कला क्रीडा संगीत व दिव्यांग विभागमधून नीलिमा गरपाल (अमरावती), माध्यमिक शिक्षण विभागातून वीरेंद्र ब्राह्मण (अमरावती) आदींची निवड झाली असून माधुरी - अमझरे (अमरावती), श्रीकृष्ण चव्हाण - (धामणगाव रेल्वे), किरण साकरकार (अचलपूर), आरिफफुर्रहमान मो. हनीफ (अंजनगाव सुर्जी), पंकज दहीकर (भातकुली), मंजिता खार्वे (चांदूर बाजार), राजेंद्र वानखेडे (चांदूर - रेल्वे), सुनील जाणे (चिखलदरा), सुषमा डीसी मोहन (दर्यापूर), महादेव (मोर्शी), जगदीश माहुलकर (नांदगाव खंडेश्वर), प्रमिला आखरे (तिवसा) प्रेमसुख ठोंबरे (वरुड) आदींचा शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. यामध्ये प्राथमिकचे १४ आणि माध्यमिक मधून १ दिव्यांगामधून एकया प्रमाणे शिक्षकांचा समावेश आहे.

# खादी व ग्रामोद्योग मंडळात ३५० नवे कर्मचारी घेणार

## प्रस्ताव मान्य, सभापती रवींद्र साठे यांची पत्रकार परिषदेत माहिती



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती** – खादी व ग्रामोद्योग मंडळाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मनुष्यबळ वाढवणे गरजेचे असून, येत्या काळात ३५० नवे कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. त्यासाठी राज्य शासनाने मान्यताही प्रदान केली आहे. राज्यमंत्री दर्जा असलेले या मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी गुरुवारी येथे माध्यमांशी संवाद साधला. या वेळी ही माहिती देण्यात आली.ते म्हणाले, एकेकाळी मंडळाकडे १२०० कर्मचाऱ्यांचा लवाजमा होता. परंतु सध्या राज्यभरात केवळ ३०० कर्मचारी उरले आहेत. त्यामुळे मंडळाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवून त्यात लोकसहभाग वाढवणे अडचणीचे झाले आहे. या पार्श्वभूमीवर मी तातडीने हा निर्णय घेतला असून त्यास राज्य शासनाची मान्यताही प्राप्त करून घेतली आहे. त्यामुळे येत्या काळात या मंडळाचे मनुष्यबळ वाढवले जाईल.

खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या विदर्भातील ५७ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण येथील डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय प्रबोधिनीत सुरू आहे. त्यासाठीच रवींद्र साठे या ठिकाणी आले आहेत. यानिमित्त त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, सध्या मंडळाने 'मधुबन' हा मधाचा ब्रँड विकसित केला असून, त्यावर जोर दिला जात आहेत. त्याअंतर्गत अमरावतीसह विदर्भात सात गावांची निवड पूर्ण झाली असून, आणखी सहा गावे निवडली जातील. याआधारे शेतकऱ्यांना पूरक व्यवसायाची जोड दिली जाणार असून त्याआधारे आत्महत्या कमी करण्यासही मंडळाचा हातभार लागेल. दरम्यान अमरावती जिल्ह्यात आमझरी (ता. चिखलदरा) हे पहिले 'मधाचे गाव' म्हणून नावारूपास येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेला जिल्हा समन्वयक प्रदीप चेचरे व अन्य कर्मचारीही उपस्थित होते.

चार योजनांवर अधिक लक्ष साठे म्हणाले, सध्या पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेवर काम सुरू आहे. यासोबतच मदत केंद्र, प्रधानमंत्री रोजगार योजना आणि मुख्यमंत्री रोजगार योजना यावरही मंडळाने आपले लक्ष केंद्रीत केले आहे. या चारही योजनांच्या माध्यमातून गावा-गावांत रोजगाराचे नवे जाळे तयार केले जाणार असल्याचे रवींद्र साठे यांनी सांगितले .

# शहरात ३६ दिवसांत - आढळले डेंग्यूचे१०० पॉझिटिव्ह रुग्ण

## स्वच्छत्यासाठी दिले आहेत ४० कोटींचे कंत्राट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** जिल्ह्यासह शहरातील स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षामुळे शहरात ८ महिन्यांत एकूण १२६, तर मागील १६ दिवसांत १०० डेंग्यूचे पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. उर्वरित जिल्ह्यात ८ महिन्यांत १३५ तसेच १ जानेवारी ते ५ सप्टेंबर या काळात जिल्ह्यात एकूण २६१ पॉझिटिव्ह रुग्ण आढळल्यामुळे स्वच्छता व आरोग्य यंत्रणेचे पितळ उघडे पडले आहे.

शहर स्वच्छतेसाठी सुमारे ४० कोटींचे कंत्राट देण्यात आले. तरी स्वच्छतेसह धुवारणी, फवारणी आवश्यकतेनुसार होत नाही. वास्तविक पावसाळ्यात डास उत्पत्ती टाळण्यासाठी नियमितपणे धुवारणी, फवारणी करणे गरजचे आहे. मनपाने स्वच्छता कंत्राट देताना त्यात या अटी व शर्तीचाही उल्लेख केला आहे. असे असतानाही धुवारणी, फवारणीकडे दुर्लक्ष झाल्याने शहरात डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याने शहरवासीयांनी रोष व्यक्त केला आहे.मागील आठ महिन्यात जिल्ह्यात १४९१ संशयितांपैकी २६१ डेंग्यूचे रुग्ण आढळले. मलेरिया, चिकनगुनियापेक्षाही डेंग्यूमुळे नागरिक सध्या त्रस्त झालेत. कारण, मागील आठ महिन्यात मलेरियाचे जिल्ह्यात २२, शहरात २ तसेच चिकनगुनियाचे १२५, शहरात ३१ रुग्ण आढळले आहेत. मात्र, डेंग्यूचे रुग्ण झपाट्याने वाढले असून, जिल्ह्यातील २६१पैकी शहरात ८ महिन्यात १२६ रुग्ण आढळले. यातही मागील ३६ दिवसांत १०० पॉझिटिव्ह डेंग्यू रुग्ण आढळले असून सध्या १० हून अधिक रुग्ण रुग्णालयात उपचार घेत आहेत.आरोग्य विभागाद्वारे डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजना, जनजागृती केली जात असली तरी सततच्या पावसामुळे डेंग्यूवर नियंत्रण आणणे कठीण जात असल्याचे जिल्हा आरोग्य विभाग व मनपा प्रशासनाने म्हटले आहे.




**एडीस इजिप्ती डासांची उत्पत्ती रोखणे गरजेचे**

एडीस इजिप्ती डास चावल्यानंतर डेंग्यूची लागण होते. हे डास स्वच्छ पाण्यात अंडी घालतात. त्यामुळे या डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी स्वच्छपाण्याची भांडी सतत धुणे आवश्यक असून इतर कोणत्याह ठिकाणी पाणी साठून राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी तसेच जे पाणी रिक्त करणे शक्य नसेल तेथे गप्पी मासे सोडावेत..

# मोर्शी तालुक्यातील पातूर येथे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सव संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती** – मोर्शी–पातूर येथे सर्वज्ञ श्री.चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सव संपन्न झाला आहे.बाराव्या शतकात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीनी अवतार घेऊन अनेक जीवाचा उद्धार केला. सत्य, अहिंसा,समता,त्याग आणि शांती असे अनेक सामाजिक कार्य श्री चक्रधर स्वामीनी केले.बाराव्या शतकात स्पृश्य, अपृश्य,वर्ण,भेद,जाती भेद,स्त्री–पुरुष विषमता,कर्म कांड, अंधश्रद्धा, अधर्म संचार, त्याने माणूस माणसाला ओळखत नव्हता,समाज वर्णभेद जाती भेद कडे जात होता.त्यावेळी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीनी आपले तत्व ज्ञान सांगून सत्य धर्माची स्थापना केली.पातूर ह्या गावामध्ये अवतार दिन मध्ये ध्वजारोहन, मूर्तिचे पूजन व आरती करण्यात आली असून महाप्रसाद संपूर्ण गावाने आस्वाद घेण्यात आला.हा महोत्सव शासकीय पद्धतीने करण्यात आला.ह्या महोत्सवा चे आयोजन ग्रामपंचायत व श्री चक्रधर स्वामी सेवेकरी बंडू नागपुरे,नरेंद्र फरतोडे,गजानन ठाकरे,चेतन फरतोडे,प्रवीण फरकाळे,प्रफुल्ल फरकाळे,प्रफुल पांडे,संकेत फरतोडे,राहुल वाटाने व गावकरी मंडळी नी आयोजन केले.–



# ४.२५ लाखांचा मोहाचा सडवा नष्ट

## ब्राह्मणवाडा थडी, आठनेर पोलिसांची कारवाई


### मध्य प्रदेशच्या सीमेवरील हातभट्टी अड्ड्यांवर पुन्हा धाड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ ब्राह्मणवाडा थडी**



महाराष्ट्र–मध्य प्रदेशच्या सीमेवरील हिरादेही जंगल परिसरात सुरू असलेल्या हातभट्टी दारू अड्ड्यांवर ब्राह्मणवाडा थडी व आठनेर पोलिसांच्या संयुक्त पथकाने ५ सप्टेंबर रोजी पहाटे धाड टाकली. या कारवाईत ४ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून तो नष्ट करण्यात आला. विशेष म्हणजे बुधवारी मोर्शी व मुलताई पोलिसांनी मध्य प्रदेशातील जंगल भागात धाड घालून गावठी हातभट्टीचे अड्डे उद्ध्वस्त केले होते. लागोपाठ दुसऱ्या दिवशी राज्य पोलिसांनी मध्य प्रदेश पोलिसांच्या मदतीने गावठी हातभट्टी लक्ष्य केली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही आहे.महाराष्ट्र–मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवर घनदाट जंगलामध्ये हिरादेही परिसरात मोठ्या प्रमाणात गावठी दारूचे उत्पादन होत असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक थोरात यांनी ब्राह्मणवाडा थडीचे ठाणेदार उल्हास राठोड यांना आठनेर पोलिस स्टेशनच्या ठाणेदारांशी संपर्क साधून संयुक्त कारवाई करण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार गुरुवारी पहाटे ब्राह्मणवाडा थडीचे ठाणेदार उल्हास राठोड, राजू मरसकोल्हे, अनुप मानकर, विशाल सिंघल व आरसीपी पथक तसेच आठनेरच्या ठाणेदार बबिता धुर्वे, सहायक पोलिस उपनिरीक्षक धुर्वे यांच्या संयुक्त पथकाने हिरादेही येथील जंगल परिसरात नदीच्या काठावर असलेल्या दोन गावठी दारू अड्ड्यांवरधाड टाकली. या कारवाईत २० ड्रममधील ४ हजार लीटर मोहा सडवा व २५ हजार रुपयांचे दारू गाळण्याचे साहित्य असा ४ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट केला. आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे.



महाराष्ट्र सीमेवरील मध्य प्रदेशातील मुलताई व आठनेर ठाण्याच्या हद्दीतील जंगलात मोठ्या प्रमाणात हातभट्टीची दारू गाळली जात असल्याची माहिती मिळाली. ती दारू चोरमार्गान महाराष्ट्रातील काही तालुक्यांत येत असल्याने त्यावर अंकुश राखण्यासाठी त्या दोन्ही कारवाया करण्यात आल्या. त्यासाठी एमपी पोलिसांची मदत घेतली.


**– विशाल आनंद, पोलिस अधीक्षक,**

# संतनगरी शेगावात गजानन महाराज पुण्यतिथी उत्सवास प्रारंभ; विविध धार्मिक कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.शेगाव** – श्री संत गजानन महाराजांच्या ११४ व्या पुण्यतिथी उत्सवास थाटात प्रारंभ झाला. यानिमित्त ८ सप्टेंबरपर्यंत श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रींच्या मंदिरात पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सकाळी ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ रात्री ८ ते १० कीर्तन, ६ सप्टेंबर ह.भ.प. प्रशांत बुवा ताकोते (शिरसोली), ७ सप्टेंबर ह.भ.प. भरत बुवा पाटील (म्हैसवाडी), आणि ८ सप्टेंबर ह.भ.प. बाळू बुवा गिरगावकर (गिरगाव) आणि ह.भ.प. भरत बुवा पाटील म्हैसवाडीकर यांचे सकाळी ७ ते ९ वाजतापर्यंत समाधी सोहळ्यानिमित्त कीर्तन होणार आहे.उत्सवाच्या प्रारंभिक टप्प्यात गणेशयाग व वरूणयागास ४ सप्टेंबरला आरंभ झाला आहे. दि. ८ सप्टेबर रोजी सकाळी १० वा. यागाची पुर्णाहूती व अवभृतस्नान श्रीचे ब्रम्हवृंद यांच्या उपस्थितीत होईल. दुपारी उत्सवाची पालखीचे श्रींच्या रजत मुखवट्याचे पुजन होवून श्रींच्या पालखीचे रथ, मेणा, पताका टाळकरी, अश्वासह परिक्रमा निघेल. सायंकाळी मंदिरात श्रींची महाआरती व टाळकरी यांचा आकर्षक रिंगण सोहळा व श्रींची आरती होणार आहे. दि.९ सप्टेबर रोजी हभप श्रीधरबुवा आवारे मु.खापरवाडी यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे कीर्तन होईल व नंतर दहीहंडी गोपाळकाला कार्यक्रम होणार आहे.





**लखख प्रकाशाने उजळले मंदिर–** यानिमित्त संत गजानन महाराज संस्थानच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरात सर्वत्र केळीचे खांब व आंब्याच्या पानांचे तोरण लावण्यात आले आहे. यामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. श्रींच्या नामघोषात भक्त तल्लीन झाले असून महाराष्ट्रातील मराठवाडा, खानदेश, विदर्भासह मध्य प्रदेशातील भजनी दिंड्या 'ज्ञानोबा तुकाराम'चा नामघोष करीत संत नगरीत श्रींच्या पुण्यतिथी उत्सवात सहभागी होत आहेत.

**भाविकांसाठी सुविधा**

भक्तांच्या सोयीसाठी श्रींचे दर्शनसाठी एकेरी मार्ग आखण्यात आला आहे. त्यात दर्शनबारी, श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण मंडप, श्रींची गादी व पलंग तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासामध्ये नियमानुसार अल्पदरात राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्याप्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे. भक्तांना कोणताही त्रास होवू नये यास्तव श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत. या उत्सव काळात सर्वतोपरी सोयीसुविधा संस्थानच्या वतीने पुरविल्या जात आहेत.

**उत्सवानिमित्त महाप्रसादाचे आयोजन–** श्री गजानन सेवा समितीद्वारा श्रींच्या ऋषिपंचमी उत्सवानिमित्त महाप्रसादाचे आयोजन अग्रसेन भवन येथे ७ आणि ८ सप्टेबर रोजी करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजेपासून रात्रीपर्यंत अविरत महाप्रसाद वाटप सुरू राहणार आहे. शेगाव, नागपूर, अकोटचा भक्त परिवार, श्री गजानन सेवा समिती दरवर्षी ऋषिपंचमी, रामनवमी, प्रगटदिन या उत्सव काळात श्रींच्या भक्तांना महाप्रसादाचे वितरण करून आपली सेवा अर्पित करीत असतात.

# गावकऱ्यांचे श्रद्धास्थान वरूड (बगाजी) महालक्ष्मी ११७ वर्षांची परंपरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ६ अमरावती**

धामणगाव रेल्वे तालुक्यातील वरुड (बगाजी) येथील ॲड. प्रदिप देशमुख यांच्याकडील महालक्ष्मी उत्सवास ११७ वर्षे पूर्ण होत आहेत. या उत्सवाचे महत्व अमरावती जिल्हयातील वरुड (बगाजी) व परिसरातील व्यक्तींना अनन्यसाधारण आहे. वरुड (बगाजी) येथील प्रगतशील शेतकरी कर्मयोगी स्व. श्री बापूरावजी ऊर्फ काकासाहेब देशमुख यांनी या महालक्ष्मी उत्सवाचे महत्व समजून १०० वर्षापूर्वी ज्या गोरगरीब मागासवर्गीय, आदिवासी, शेतकरी शेतमजुरांना पूर्णवेळ जेवण मिळत नव्हते अशा गावकऱ्यांना महाप्रसादाच्या रूपाने ते आपल्या वाड्यामध्ये मिष्ठान्न भोजनासाठी निमंत्रित करीत असे, गावकरी मोठ्या श्रध्येने त्यांच्या या सार्वजनिक कार्यामध्ये सहभागी होत असत.

आजही हा कार्यक्रम त्यांचे सुपुत्र ॲड. प्रदीपराव देशमुख हायकोर्ट नागपूर मोठ्या श्रद्धेने करतात. संपूर्ण गावाला ते आपल्या वाड्यामध्ये महाप्रसादाला निमंत्रित करतात. या दिवशी या गावामध्ये अनेक घरी महालक्ष्मी असल्याने कोणाच्याही घरी वेगळी चूल पेटविली जात नाही. या दिवशी गावकऱ्यांना व प्रत्येक पाहुण्यास देशमुखांकडे महालक्ष्मीच्या दर्शनाचे व महाप्रसादाचे निमंत्रण असते सर्व गावकऱ्यांना जेवणासोबत मिष्ठान्न व आंबील चा प्रसाद वाढला जातो. ही प्रथा गेल्या ११७ वर्षांपासून चालत आलेली आहे. यावर्षी हा उत्सव



दिनांक १०,११,१२ सप्टेंबर २०२४ रोजी अनुराधा नक्षत्रावर आयोजित करण्यात येत आहे. तर पहिल्या दिवशी आरती करून श्री महालक्ष्मीचे आगमन होते. दुसऱ्या दिवशी १६ भाज्या, मिष्ठान्न व आंबीलचा नैवेद्य दिला जातो, तर आघाडा, केना, दुर्वा आणि सुवासीक फुले वाहिली जातात. तिसऱ्या दिवशी स्वासीन महिलांद्वारे त्याची ओटी भरून मनभावे पूजा करून त्यांची रवानगी करण्याची प्रथा आहे. चवथ्या दिवशी आंबील व फळांचा प्रसाद करून कार्यक्रमाची सांगता केली जाते. देशमुख कुटुंबातील मंडळी ५ दिवस या कार्यक्रमासाठी जातीने उपस्थित असतात. नविन लग्न झालेल्या जोडप्यांच्या हस्ते आरती करण्याची परंपरा व प्रथा आहे.

देशमुखांकडे हा महालक्ष्मी उत्सव गेल्या ३१० वर्षांपासून होत असल्याचे गावकरी सांगतात. हि परंपरा ऐतिहासिक राजे भोंसले कालीन असल्याचे सांगतात या दिवशी गावकरी दिवाळीचा सण समजून जावई व मुलींना घरी बोलावून देशमुखांकडील महालक्ष्मीच्या दर्शनाला पाठवितात. पूर्वी हा सन देशमुखाकडील ऐतिहासिक गडीमध्ये आयोजीत करण्यात येत असे ही गढी संत बगाजी सागर धरणात गेलेली आहे. गढीला १०० फुट उंच ४ मोठे बुरुज होते. पूर्वेकडील बुरुजाजवळील चौकात महालक्ष्मी बसविल्या जात होती. तर ५ वर्षातून एकदा वर्धा नदी माय (पौराणिक नाव वशिष्ठा) महापुराचे निमित्याने देशमुखांच्या वाड्याला आंघोळ घालून महालक्ष्मीचे दर्शन घेत असे. अशा प्रसंगाला गावकरी स्वतःला धन्य समजत असे.

# ११ सप्टेंबर रोजी विद्यापीठाला सुट्टी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**




**दि.६अमरावती –** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला बुधवार, दि. ११ सप्टेंबर, २०२४ रोजी महालक्ष्मी पूजनाची सुट्टी जाहीर करण्यात आली असून त्या दिवशी सर्व प्रशासकीय विभाग बंद राहतील. दि. ११ सप्टेंबर रोजी जाहीर केलेल्या सुट्टीच्या ऐवजी विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय विभाग रविवार दि. २२ सप्टेंबर, २०२४ रोजी नियमितपणे सुरु राहतील. तरी याची सर्व पालक, विद्यार्थी, अभ्यागत, नागरिक व संलग्नित महाविद्यालयांनी नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कळविले आहे. विद्यापीठाचे स्नातकोत्तर विभागातील शैक्षणिक कर्मचायांना (ॲकेडेमिक स्टाफ) शैक्षणिक नियमिकेप्रमाणे (ॲकेडेमिक कॅलेंडर) सुट्टए राहतील, असेही विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# श्री रुक्मिणी गणेशोत्सव मंडळ साकारणार उज्जैन येथील महाकाल मंदिराचा देखावा

## गणेशोत्साव भक्तांसाठी दर्शनाची सोय; १२ ज्योतिर्लिंगाचेही होणार दर्शन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

शहरातील प्रसिद्ध तसेच जुन्या मंडळांपैकी - एक असलेले श्री रुक्मिणी गणेशोत्सव मंडळ यंदा उज्जैन येथील महाकाल मंदिराचा देखावा साकारणार आहे. याशिवाय १२ ज्योतिर्लिंगांचे दर्शनही यावेळी भाविकांना - घेता येणार आहे. मंडळाचे अध्यक्ष भूषण फरतोडे, उपाध्यक्ष मनोज भोजने आणि त्यांची चमू त्यासाठी प्रयत्नरत आहे.

शहराच्या मध्यभागी रुक्मिणीनगर येथील सायंस्कोर मैदान येथे असलेले मंडळ आपले ३९ वे वर्ष साजरे करणार आहे. लोकनेते स्वर्गीय संजय बंड आणि मनोज भोजने यांनी - १९८५ मध्ये श्री रुक्मिणी गणेश उत्सव मंडळाची स्थापना केली. त्यानंतर मंडळाच्या अनेक युवकांनी तो वारसा चालवला. आता ही धुरा युवा वर्गाच्या हातात आहे. याआधी मंडळाने देशभरातील अनेक ऐतिहासिक - आणि पौराणिक धार्मिक स्थळांच्या - प्रतिकृती तयार करून अमरावतीकरांना - त्यांच्याच शहरात भारत-दर्शन घडवले आहे. - नयनरम्य देखाव्यासह अत्यंत साधेपणाने - उत्सव साजरा करणाऱ्या या मंडळाने आपल्या कारकीर्दीतील अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रमही राबवले आहेत. त्यामुळे - केवळ उत्सव नव्हे, तर एक सामाजिक कार्य या भूमिकेतून सदर मंडळाचा गणेशोत्सव याआधी रक्तदान, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षदान, मेळघाटातील विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्य वाटप, नागरिकांना जुन्या परंतु, सुस्थितीत असलेल्या सायकली वाटप यासारख्या समाजोपयोगी विविध उपक्रमांचा समावेश आहे. तसेच मंडळामध्ये येणाऱ्या मान्यवरांना बेलाचे वृक्ष भेट देण्यात येते. उत्सवा दरम्यान १ हजार बेलाचे वृक्ष (रोपटे) वाटप करण्यात येते. तत्पूर्वी मंडळाच्या वतीने यावर्षी साकारण्यात येणारा उज्जैन येथील महाकाल मंदिर देखावा काटोल येथील प्रसिद्ध कलाकार नरेंद्र थोटे यांच्या हस्ते साकारण्यात येणार आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही ६ फुटांची शाडू मातीपासून बनवलेली गणेश मूर्ती असणार आहे.

### ही आहे मंडळाची कार्यकारिणी

मार्गदर्शिका प्रिती बंड, धनंजय बंड, मंडळाचे अध्यक्ष भुषण फरतोडे, स्वागताध्यक्ष प्रवीण अळसपुरे, उपाध्यक्ष मनोज भोजने, पीयूष गावंडे, मंगेश राऊत, निहार लकडे, उदय देशमुख, स्वप्नील साव, सचिव स्वराज देशमुख, कोषाध्यक्ष विपुल टेकाडे, संयोजक राहुल इंगोले, मोहित जवंजाळ, सहसचिव ओम राऊत, , मनिष जगताप, सह कोषाध्यक्ष श्रीपाद भगत, केदार भेंडे, सहसंयोजक संचित वैद्य, वेदांत उगले, यश धर्माळे, प्रसिद्धी प्रमुख रोहन पाटिल, तेजस साखरकर, प्रतीक पाटेकर तर सदस्य मुकेश भोजने, नीलेश गणगणे, मनोहर देवतळे, अश्विन भेंडे, ओम बुंदेले, सारंग बुंदेले, तेजस हाडे यांच्या समावेश आहे.

# भातकुली तालुक्याला ओला दुष्काळ जाहिर करा - नितीन कदम

## शेकडो शेतकऱ्यांसोबत नितीन कदम यांनी कृषी कार्यालयात धडकले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ भातकुली**

भातकुली तालुक्यात सतत सूरु असलेल्या पावसामुळे व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. या संदर्भात तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, तात्काळ पिकांची पंचनामे करून पिक विमा चे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे या आशयाचे निवेदन कृषी अधिकारी, कृषी कार्यालय भातकुली व तहसीलदार साहेब तहसीलदार कार्यालय येथे शेकडो शेतकऱ्यांसोबत संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी निवेदन दिले.

गणेशोत्सवाच्या तोंडावर परतीच्या पावसाने शेतकऱ्यांना झोडपून काढले. ऐन दिवाळीच्या तोंडाशी शेतकऱ्यांच्या हातात आलेले पीक परतीच्या पावसामुळे हातातून निघून गेले आहे. संपूर्ण अमरावती जिल्ह्यासह ठिकाणी परतीच्या पावसाचा फटका जास्त प्रमाणात बसला आहे. संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी नुकताच भातकुली तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यातून शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांची परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न कदम यांनी केला.कदम यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, 'तालुक्याभरात अतिमुसळधार परतीच्या पावसामळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून लवकरात लवकर राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा.अवेळी जो पाऊस येतो, तो जरी सरासरीपेक्षा कमी असला तरी त्यामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान होतं. किती पाऊस पडला हे महत्वाचं नसतं तर तयार असलेली पिकं या पावसामुळं बर्बाद होतात. त्यामुळं पाऊस किती झाला हे महत्वाचं नाही तर यामुळं शेतकऱ्यांच नुकसान किती झालं हे महत्वाचं असल्याचे कदम म्हणाले.यावेळी संकल्प शेतकरी संघटनेचे नितीन कदम यांच्या समवेत भातकुली तालुकाध्यक्ष प्रफुल महल्ले, ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय चूनकीकर, दिलीप मंत्री,योगेश भट्टड, बाबा पाटील,विनोद पतालिया,गजानन चुनकीकर,मोहन भातकुलकर,वासुदेव तिडके,प्रल्हाद सरोदे,बन्सी लाठी, निलेश लढा,उत्तम देशमुख,बाळासाहेब देशमुख,मुकुंद बांबल,राजाभाऊ झासकर,दीपक शृंगारे,सुधीर देशमुख,प्रदीप ठाकूर,संतोष पवार,दिलीप ढोके,गोलू मोहोळ,गुरुदास दुर्गे,सुभाष चेचरे,प्रदीप वनारे,अर्पण भजभूजे,सागर पंचबुद्धे,गजानन सवाई,दिलीप बांते,हरिभाऊ ठाकरे,साहेबराव कचरे,सुधाकर कचूरे,विजय गजभिये,पंकज कावेलकर व शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# शिक्षकांचे कार्य हे देश निर्मीतीचे - प्रा. डॉ. हेमंत देशमुख

## रोटरी क्लब अमरावती अंबिका तर्फे झाला शिक्षकांचा सत्कार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

समाज घडविण्यासोबतच राष्ट्र निर्मितीची शिक्षकांवर जबाबदारी असते. समाजातील आदर्श घटक म्हणून शिक्षकांकडे बघितले जाते. शिक्षकांनी सुसंस्कृत पिढी तयार करून राष्ट्र निर्मितीत आपले योगदान द्यावे असे आवाहन विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख यांनी केले.

रोटरी क्लब अमरावती अंबिका हे विविध सामाजिक उपक्रम राबवीत असते ह्यात शिक्षक दिनाचे औचित्य साधुन आज शिक्षकांचा व प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.ह्यात विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती चे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, प्रा. रागीणी देशमुख, निलम रस्तोगी, निलेश निंदाणे, भारती गणवीर, दिव्या झाम्बानी, पुर्णिमा सुरणजेसे यांचा सत्कार रोटरी क्लब अमरावती अंबिकाचे अध्यक्ष राम चोटलानी, सुरेश मेठी, ऐ.जी डॉ. संगीता कडु, अमोल चवणे, अखिलेश खेतान, मुस्कान जयसिंगानी, दिनेश सरावगी, गौरव वानखडे, डॉ. लोभस घडेकर, हार्दिक कक्कड, अमित तिडके, मुख्य मार्गदर्शक समिर केडीया, अतुल कोल्हे, डॉ. मोनाली ढोले, दिलीप कैसकीया, नरेंद्र खंडेलवाल, रोहीत अग्रवाल, ममता खंडेलवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आला.या वेळी शिक्षकांचे कार्य हे देश निर्मिती असल्याचे व एक शिक्षक पुढील पिढी घडवतो असे मत प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.कार्यक्रमांची सुरवात रोटरी प्रार्थनेने करण्यात आली. यावेळी रोटरी सदस्य जे शिक्षक किंवा प्राध्यापक आहे यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला,

ज्यात दिलीप केंसकीय,प्रा प्रवीण बोडखे,. कीर्ती बोडखे,. डॉ संग्राम देशमुख, डॉ अपरिजिता देशमुख, डॉ लोभस घडेकर ,डॉ समीर केडिया , डॉ मनोज चिठोरे, डॉ विजय गुल्हाने, डॉ परिमल , डॉ पंकज मोरे , डॉ पूजा कोल्हे यांचा सत्कार त्यांच्या शैक्षणिक योगदाणासाठी करण्यात आलाकार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ मनोज चिठोरे यांनी काम केले.कार्यक्रमाला मोठया प्रमाणात रोटरी सदस्य उपस्थित होते.

# इतर राज्यातही कार चालवायची? 'बीएच' सिरीज घ्या!




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

आता वाहन नोंदणीची बीएच सिरीज सुरू करण्यात आली आहे. यामुळे राज्य बदलले तरी आता वाहनांचे नंबर बदलावे लागणार नाहीत. अमरावती जिल्ह्यात दोन वर्षांपासून ही सिरीज सुरू झाली आहे. या अंतर्गत आता वाहनांची नोंदणीही सुरू झाली आहे.

वाहनांचे राज्यांदरम्यान स्थलांतरण सुलभतेने व्हावे, यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २६ ऑगस्ट २०२१ रोजी जारी केलेल्या सूचनेनुसार, आता चारचाकी वाहनांच्या नोंदणीकरिता भारत मालिका (बीएच- सिरीज) ही नवी नोंदणी मालिका सुरू केली आहे. नव्या 'बीएच' सिरीजचा सर्वाधिक फायदा हा केंद्रीय कर्मचारी तसेच राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना होणार आहे.तसेच ज्या व्यक्तींची सातत्याने परराज्यात बदली होते, अशा खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी देखील ही सिरीज महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे चारचाकी वाहन चालकांना नंबर बदलविण्यांचे कटकट संपणार आहे.

असे असणार नंबरनवीन सिरीजची सुरुवात बीएच या अक्षराने सुरु होईल. त्याआधी रजिस्ट्रेशन वर्ष असेल. उदाहरणार्थ, २०२१ मधील २१ अंक तिथे असेल. बीएच हा भारत सिरीज कोड आहे. त्यानंतर ४ अंकी क्रमांक राहील. शेवटी राज्याचे शब्द राहतील.

**बीएच सिरीजसाठी कोण करु शकतो अर्ज?**

वाहन चालकांना बीएच सिरीज हवी असल्यास त्यासाठी सर्वात महत्त्वाची अट म्हणजे तुम्ही दोन वर्षांचा रोड टॅक्स भरलेला असावा. जर तुम्ही दोन वर्षांचा रोड टॅक्स भरलेला असेल तर तुम्हीही बीएच सिरीज घेऊ शकता. बीएच सिरीजसाठी परिवहन मंत्रालयाच्या पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी लागेल.

वाहन डीलरच्या मदतीने देखील नोंदणी करू शकतो. नोंदणी करताना विचारण्यात आलेले सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे तेवढेच आवश्यक आहे.

# जिल्हा परिषदेत 'एचओडी'ची पदे खाली, प्रभारीवर कामकाज चाले




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती जिल्ह्याचे मिनीमंत्रालय म्हणून ओळखल्या जाणार्या जिल्हा परिषदेतील महत्त्वाच्या विभागातील अधिकार्यांची, तर सहा पंचायत समित्यांमध्येही गटविकास अधिकारी (बीडीओ) ची पदे रिक्त आहेत. त्यामुळे मुख्यालयासह सहा पंचायत समित्यांचा कारभार प्रभारी अधिकार्यांवर चालविला जात आहे.

जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात विविध प्रकारच्या योजना व ग्रामविकासाची कामे केली जातात. मात्र, गत दोन वर्षांपासून मिनी मंत्रालयातील काही महत्त्वाचे विभाग असलेल्या शिक्षण विभागात प्राथमिक शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी योजना, ग्रामीण पाणीपुरवठा, वित्त आदी विभागांत गत काही महिन्यांपासून अधिकारी नाहीत. नियमित त्यामुळे या विभागाचा कारभार हा प्रभारी अधिकार्यांवर चालविला जात आहेत. विशेष म्हणजे, नियमित अधिकारी नसल्यामुळे प्रशासकीय कामकाजासह विकासकामांवर याचा प्रभाव होत असल्याचे दिसून येते. याशिवाय जिल्हा परिषद आणिग्रामपंचायत यामधील दुवा असलेल्या ६ पंचायत समितींत बीडीओंची पदे रिक्त आहेत. यामध्ये अमरावती चिखलदरा, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर आणि चांदुर बाजार या तीन पंचायत समितींमध्ये नियमित गटविकास अधिकारी नसल्यामुळे या ठिकाणचा प्रशासकीय कारभार हा प्रभारी अधिकार्यांच्या भरवशावर चालत आहेत. या रिक्त पदांपैकी काही अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत, तर कुणाची बदली झालेली आहे. त्यामुळे महत्त्वाच्या विभागातील प्रमुख अधिकार्यांची पदे रिक्त आहेत.

# अकोला कृउबास येथे सोमवारी अवयवदान जनजागृती कार्यक्रम

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची विशेष उपस्थिती : पोस्टर व निबंध स्पर्धेचे बक्षीसवितरण : देहदाते व नेत्रदात्यांचा होणार सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अकोला**

अवयवदानाबाबत जनजागृतीसाठी जिल्ह्यात आयोजित निबंध, पोस्टर स्पर्धेचे बक्षीसवितरण व जनजागृती कार्यक्रम केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण, आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सोमवार दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. होणार आहे. माजी सहकारमंत्री व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. वसंतराव धोत्रे यांच्या सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे विविध संस्थांच्या सहकार्यातून हा कार्यक्रम आयोजिण्यात आला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे श्री शिवाजी शिक्षण संस्था, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा आरोग्य यंत्रणा व इंडियन सोशल अँड रिसर्च फाऊंडेशनच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजिण्यात आला आहे. केंद्रीय सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारताच स्वत: मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प जाहीर केला आहे. त्यांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला असल्याची माहिती मुख्य संयोजक संदीप पुंडकर, लोकनेते वसंतराव धोत्रे स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिरीष धोत्रे व संयोजक चंद्रशेखर खेडकर यांनी दिली.

**प्रभातफेरी व अवयवदात्यांचा सत्कार**

कार्यक्रमाचा शुभारंभ श्री शिवाजी महाविद्यालयातून प्रभातफेरीने होणार आहे. यावेळी अवयवदानाची पालखी काढण्यात येईल. त्याचप्रमाणे, जिल्ह्यातील ८० देहदाते व नेत्रदात्यांच्या कुटुंबियांचा गौरव यावेळी केला जाणार आहे.

उगवत्या पिढीमध्ये अवयदानाबाबत जागरूकता वाढावी म्हणून ८ ते १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा, तसेच वर्ग ८ ते १० आणि खुल्या गटासाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. या दोन्ही स्पर्धांना मोठा प्रतिसाद मिळाला. त्याचे पारितोषिक वितरण यावेळी होणार आहे. त्याचप्रमाणे, पोस्टर मेकिंग स्पर्धेतील उत्कृष्ट पोस्टर्सचे प्रदर्शनही यावेळी भरविण्यात येईल.

# अन्यायग्रस्त आरएफओंची कैफियत मुख्यमंत्र्यांच्या दरबारात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

राज्यातील १७९ आरएफओंच्या नुकत्याच प्रशासकीय बदल्या झाल्यानंतर आता विनंती बदल्यांसाठी मोक्याच्या जागा रिक्त ठेवल्यामुळे वन विभागात चर्चेला उधाण आले आहे. मात्र प्रशासकीय बदल्यांमध्ये अन्याय झालेले काही आरएफओ राजकीय आश्रयास गेले असून या रिक्त पदांचा मुद्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरबारात पोहोचविला आहे. त्यामुळे सध्या तरी विनंती बदल्यांना 'ब्रेक' लागल्याचे दिसून येते.

मार्चमध्ये मागितल्या गेलेल्या पसंतीक्रम वेळी एकूण १२९ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांसाठी ८८ वनपरिक्षेत्र रिक्त दाखवण्यात आले होते. त्यानंतर ऑगस्ट महिन्यामध्ये १९७ वनपरिक्षेत्र अधिकारी यांची सहाय्यक वनसंरक्षक पदोन्नती झाल्यानंतर सदर जागा रिक्त झाल्यामुळे त्यांच्यासाठी नव्याने पसंतीक्रम मागविण्यात आले नाहीत. हा सर्व प्रकार विनंती बदल्यांमध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर 'अर्थ'पूर्ण कारणासाठी मुद्दाम होऊन केल्याचे बोलले जात आहे. तसेच वृत्तनिहाय महत्त्वाच्या प्रादेशिक तसेच वन्यजीव जागा रिक्त ठेवण्यात आले आहे.

# रेल्वे स्टेशन जवळील गुलशन टॉवर मार्केटमध्ये घाणीचे साम्राज्य

## उपायुक्त माधुरी मडावी मॅडम लक्ष घालणार का?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या कर्तव्यदक्ष उपायुक्त माधुरी मडावी यांनी एक वेळा शहरातील मुख्य चौक असलेल्या रेल्वे स्टेशन जवळील गुलशन टॉवर मार्केट मध्ये भेट देत या ठिकाणी होत असलेल्या घाणीचे साम्राज्य बघावे व ठिकाणच्या व्यावसायिकांना दंड ठोठवावा अशी मागणी आता सामान्य नागरिक व याठिकाणी येत असलेला ग्राहक वर्ग व्यक्त करीत आहे.

अमरावती शहराच्या रेल्वे स्टेशन जवळील गुलशन टॉवर मार्केट मध्ये किमान १०० च्या जवळपास दुकाने आहेत मात्र याठिकाणचे दुकानदार कोणत्याच प्रकारची डस्टबिन चा वापर करीत नाही दुकान बंद करतांना सर्व कचरा दुकानासमोर टाकून घरी निघून जातात विशेष म्हणजे याच मार्केट मध्ये एक पॅथेलॉजी लॅब आहे त्या ठिकाणी सकाळी सात वाजल्या पासून अनेक रुग्ण हे रक्त चाचणीसाठी येतात मात्र या सर्वांना या घाणीच्या मधून वाट काढून समोर जावे लागते हे विशेष त्यामुळे या ठिकाणी अमरावती महानगर पालिकेच्या उपायुक्त माधुरी मडावी यांनी किमान एकदा तरी अवश्य भेट द्यावी अशी मागणी आता नागरिक करीत आहे. मडावी मॅडम यांनी शहरात अनेक ठिकाणी भेटी देत स्वछ्तेबाबत आढावा घेत अनेक दुकानदारांना व द स्पॉट दंड ठोठावत त्यांना वठणीवर आणले त्यांचा दरारा शहरात आजही कायम आहे त्यामुळे या मार्केट मधील मग्रूर दुकानदारांना वठणीवर आणत त्यांना स्वछतेचे धडे गिरवावेत अशी अपेक्षा या ठिकणी येणारा ग्राहक व्यक्त करीत आहे.

**गोळ्या बिस्कीट च्या आडून गुटका,प्लॉस्टिक पन्नीची सर्रास विक्री**

याच मार्केट मध्ये अनेक गोळ्या ,बिस्कीट चे दुकाने केवळ नावापुरते आहेत मात्र त्याच्या आडून या ठिकाणी गुटख्याची छुप्या पद्धतीने विक्री राजरोसपणे सुरु आहे सोबत च प्लँस्टीक पन्नी वेगवेगळ्या आकारात या ठिकाणी छुप्या पद्धतीने विक्रीस उपलब्ध आहे आणि त्याच व्यावसायिकांचा कचरा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमा होतो मात्र कोणत्याही दुकानदाराकडे डस्टबिन वापरात नाही हे विशेष.

# वाढदिवसानिमित्य श्रीकृष्ण मंदिर व अंबा माता देवीची आरती....





पप्पू भाऊ पाटील यांनी वाढदिवसानिमित्य श्रीकृष्ण मंदिर व अंबा माता देवीची आरती केली. भाऊ साहेब पंजाबराव देशमुख व डॉक्टर बाबासाहेब आंबडेकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करूनइर्विन चौक येथे आपल्या कार्यालयात शुभेच्छा स्वीकारल्या. जिल्हाध्यक्ष प्रवीण डांगे, शहर अध्यक्ष धीरज तायडे, शहर संघटक बबलू आठवले, गौरव बांते, सचिन बावनेर, भावेश निंभोरकर,मयंक तांबूस्कर, व कार्यकर्ते उपस्थित होते.

# फक्त रवा आला : उर्वरित चार साहित्य आलेच नाहीत

## सण तोंडावर, पण शिध्याचा आनंद फक्त दिखाव्यापुरताच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

उद्या ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून, १० सप्टेंबर रोजी गौरींचे आगमन होणार आहे. गौरी-गणपतीच्या सण उत्सवाच्या तोंडावर राज्य शासनाने रेशनमधून लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, पुरवठादाराकडून तालुक्याला आतापर्यंत फक्त रवाच पाठविण्यात आला आहे, तर उर्वरित चार जिन्नस अद्याप मिळाले नसून यासाठी आणखी किती दिवस लागणार आहे. यामुळे लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा कधी हाती येणार याबाबत सांगणे जरा कठीणच आहे.

पुरवठा विभागाकडूनलाभार्थ्यांसाठी आनंदाच्या शिधाची मागणी करण्यात आली होती. - शासनाकडून मंजुरी देण्यात आली आहे. अगोदरच आनंदाच्या शिधामधील जिन्नस हाती आल्या नसल्याने आनंदाचा शिधा वितरण उशिरा सुरू होणार त्यामुळे पुरवठा विभागाची अडचण होत आहे.

भाजप-शिंदे गट शिवसेनेचे राज्यात सरकार आल्यानंतर या सरकारने गोरगरिबांच्या घरातही सण-उत्सवात गोडधोड तयार करता यावे यासाठी आनंदाचा शिधा वाटपाचा निर्णय घेतला होता. तेव्हापासून राज्य शासनाकडून सण-उत्सवात आनंदाचा शिधा रेशन आहे.



लाभार्थ्यांना पुरविला जात आता उद्या ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून, १० सप्टेंबर रोजी गौरींचे आगमन होणार आहे.अशात रेशन लाभार्थ्यांना परत एकदा आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. ५ प्रकारच्या जिन्नस असलेला हा आनंदाचा शिधा रेशन लाभार्थ्यांना रेशन दुकानांतून वाटप केला जातो. मात्र आता सप्टेंबर महिना सुरू झाला असूनही आनंदाच्या शिधामधील सर्व जिन्नस साकोली तालुक्याला मिळालेले नाहीत.


**हे साहित्य राहणार आनंदाच्या शिधात**

पाच प्रकारच्या साहित्य असलेला हा आनंदाचा शिधा रेशन लाभार्थ्यांना दिला जातो. यामध्ये एक किलो तेल, एक किलो रखा, एक किलो चणा डाळ, एक किलो साखर व एक विशेष पिशवी असते. या विशेष पिशवीत चारही जिन्नसांचे प्रत्येकी एक पाकीट टाकून तयार केलेली एक पिशवी म्हणजे आनंदाचा शिधा होय. मात्र, साकोली चालू केला फक्त रवा मिळाला आहे. उर्वरित चार साहित्य अद्याप मिळालेल्या नाहीत. फक्त रवा तालुक्याला मिळाला आहे, तर उर्वरित साहित्यासाठी आणखी चार-पाच दिवसांची वाट बघावी लागणार असल्याची माहिती आहे.

# आझाद हिंद मंडळ साकारणार भगवान श्रीदत्तगुरु अवतार देखावा
## मुख्य आकर्षण श्रीदत्तगुरु भगवानची २० फुट उंच प्रतिमा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावती यंदा ९७ व्या वर्षात पदार्पण करत असताना मंडळाच्या परंपरे नुसार भव्य दिव्य गणेशोत्सव साजरा करणार आहे. मंडळाचा गणेशोत्सव हा संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक प्राप्त आहे. मंडळाने या पूर्वी अनेक भव्य दिव्य देखावे सादर केले आहे. त्या मध्ये लाल किल्ला, ताजमहाल, अक्षरधाम मंदिर, कोणार्क सूर्य मंदिर, स्वामी विवेकानंद स्मारक कन्याकुमारी, अजिंठावेरुळ लेणी, विदर्भातील प्रसिद्ध लासूर मंदिर, पदमनाभमंदिर, तिरुपती बालाजी मंदिर, पंढरपूर विठ्ठल मंदिर, पंढरपूर वारी देखावा, बारा ज्योतीलिंग, आदियोगीचा देखावा व श्रीकृष्ण लिला या सोबतच अनेक सामाजिक तसेच अध्यात्मिक विषयावर देखावे साकारले आहे. तसेच मंडळाच्या गणेशोत्सव मध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, समाजप्रबोधन चे कार्यक्रम मध्ये नाटक, मराठी हिंदी कविसंमेलन, व्याख्याने तसेच देशातील ज्वलन्त विषयावर नागरिक वादविवाद असे भरगच्च कार्यक्रम संपन्न झाले आहे. या वर्षी देखील गणेशोत्सव मोठया उत्साहने साजरा करण्याचे ठरले आहे. या वर्षी भगवान 'श्रीदत्तगुरु अवतार' देखावा तसेच मुख्य आकर्षण श्रीदत्तगुरु भगवानची २० फुट उंच प्रतिमा विशेष आकर्षण राहणार आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलाकार शिवा प्रजापती व त्यांचे सहकारी मागील २ महिन्या पासून देखावा तयार करण्याचे काम करत आहे. तसेच अकोला चे गुलाब डेकोरेशन यांची आकर्षक विदुयत रोषणाई राहणार आहे.



'श्री'ची मुर्ती प्रसिध्द मुर्तीकार गजानन सोनसळे यांनी तयार केली आहे. तसेच उत्सवा करिता कोनलाडे मंडप कॉन्ट्रॅक्टर, गुप्ता डेकोरेशन, चौधरी डेकोरेशन, शुभम ठाकुर यांची साऊंड सर्विस यांचे सर्वांचं सहकार्याने यंदा चा गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे.

'श्री' च्या स्थापने ची भव्य शोभायात्रा शनिवार दिनांक ७ सप्टेंबर ला दुपारी ३.०० वाजता मंडळातुन निघणार असून शहरातील मुख्य बाजारपेठेतुन परिक्रमा करून परत मंडळात येईल. तसेच मंडळाच्या शंभर स्वयंसेवकांचे लेझीम पथक, शंभर मुलींचे टिपरी नृत्य, मंडळाच्या शंभर महिलांचे पाऊलीभजन हे शोभयात्रेचे विशेष आकर्षण राहणार आहे. शोभायात्रेत विविध ढोल पथक, दिंडीपथक राहील.

रविवार दि. ८ सप्टेंबर २०२४ ला 'श्री' च्या समोरील साकारण्यात आलेल्या श्रीदत्तगुरु अवतार देखावा चे उदघाटन सायंकाळी ७.०० वाजता होईल.शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ ला 'जिव रंगला' भावभक्ती गितांची सुरेल मेजवानी कलाकार प्रख्यात गायक श्री. भावीक राठोड, सारेगमप व इंडियन आयडल फेम अंजली गायकवाड, सुर सम्राट फेम नंदीनी गायकवाड आणि ज्योती नालसे व संच कार्यक्रम स्थळ सांस्कृतीक भवन अमरावती या ठिकाणी होईल.

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ ला सायंकाळी ५.३० वाजता आरोग्य व रक्ततपासणी शिबीर माधवबाग साईनगर येथील डॉ सौ पार्वती मोरे व त्यांची टीम करतील. तसेच दंत तपासणी शिबिर डॉ. राशी ब्रिजेश दम्मानी व त्यांची टिम करतील. रविवार दिनांक १५ सप्टेंबर २०२४ सायंकाळी ५ वाजता श्री अथर्वशिर्ष पारायन आझाद हिंद महिला मंडळ बुधवारा. मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ ला सायंकाळी ६.०० वाजता सत्यनारायण पूजा तीर्थप्रसाट व पानसुपारी चा कार्यक्रम होईल रात्री 'श्री' च्या पूजेच्या मूर्ती चे विसर्जन करण्यात येईल.

गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष पदमश्री श्री प्रभाकरराव वैद्य यांचे मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले माजी महापौर, उपाध्यक्ष अनंतराव गुढे माजी खासदार, डॉ किशोर फुले कोषाध्यक्ष दिलीप दाभाडे, सचिव दिलीप कलोती, प्रदीप वडनेरे माज्ज आमदार, राजाभाऊ माजलगावकर, प्रकाश संगेकर, चंदूभाऊ पवार, विवेक कलोती माजी स्थाई समित अध्यक्ष, मनपा, ज्ञानेश्वरभाऊ हिवसे, नंदूभाऊ गुंबळे, शैलेश अग्रवाल, किशोर कलोती, संतोष बद्रे शिवसेन महानगरप्रमुख, प्रा गणेश मालोकार, किशोर बोराटने तसेच गणेशोत्सव चे अध्यक्ष श्री. सचिन हिवस स्वागताध्यक्ष श्री प्रविण मानेकर संचालक मानेकर ज्वेलरी, कार्याध्यक्ष श्री. दिपक लोखंडे प्रसिध उद्योजक, उपाध्यक्ष डॉ. मुस्तफा साबिर, प्रसिध्द वैद्यकीय चिकिस्तक, डॉ. महेंद्र गुढे, प्रसिध्द वैद्यर्क चिकिस्तक, श्री आकाश शिरभाते प्रसिध्द उद्योजक, सचिव सागर इंगोले, कोषध्यक्ष निलेश वानख तसेच सहसचिव, अनिकेत नवघरे, प्रथमेश बाखडे, परेश कोरे, आकाश मोहोड, वेदांत डांगे यांचे सतीश चौधरी, संजय मुचळंबे, प्रवीण चौधरी, राजेश जायदे, संजय कदम, उमेश देशमुख, निलेश सरा मयूर जलतारे, संतोष चिखलकर, राजेश ढोले, पंकज सराफ, भूषण पुसतकर, चेतन चव्हाण, राजू बोराट सुनिल तिप्पट, विलास बीजवे, अण्णा करणे, शरद देवरनकर, मोहन खोपे, नितीन इंगोले, नितीन सर विशाल फाटे, अमित काजनेकर, राजा पिंजरकर, मनीष काजनेकर, मनिष चौधरी, सचिन कोहळे, दुलारे, अजय पुसतकर, अजय इंगोले, सतीश बद्रे, अमित काजनेकर, बाळासाहेब भेरडे, सागर रोहनन शुभम काशिकर, चेतन गुंबळे, कपिल जोशी, मिलींद कहाळे, सागर मरोडकर, तन्मय पिंजरकर, अ वानखडे, आर्यन ढोले, प्रशांत जांभुळकर, क्रिष्णा हिवसे, अर्जुन इंगोले, ह्रषिकेष गाडगे, रेवन पुसतकर, स चिखलकर, अमर चावंडे सर्व पदाधिकारी ज्येष्ठ सदस्य कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.

